रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २५४
www.ramprahar.com
सोमवार, ३ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पुन्हा नरेंद्र मोदीच पंतप्रधान बनणार : अमित शाह/२
गद्दारी करणाऱ्यांचा टांगा पलटी करू -नरेश म्हस्के/६
माजी क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांचे निधन/८

## 'मविआ'च्या वज्रमूठ सभेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले अनुपस्थित

**छत्रपती संभाजीनगर :** महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा रविवारी (दि. २) छत्रपती



संभाजीनगरमध्ये झाली. या वेळी तिन्ही पक्षांचे नेते उपस्थित होते, मात्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले गैरहजर राहिले. प्रकृती ठीक नसल्याने ते उपस्थित नव्हते, अशी माहिती समोर आली आहे, मात्र पटोलेंनी निवडलेल्या टायमिंगमुळे राजकीय भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, या सभेत सर्वच वक्त्यांनी सत्ताधाऱ्यांवर विशेषत: भाजपवर टीका करण्याचा एककलमी कार्यक्रम राबविला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही राणा भीमदेवी थाटात भाषण ठोकले, मात्र त्यांच्या भाषणात तोच तोचपणा जाणवला. नेहमीचीच वाक्ये घुमवून फिरवून त्यांनी आपला सूर आळवला. त्यामुळे उपस्थितांचा निरस झाला.

# उरण मतदारसंघात विकासाची गंगा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्गार | चौक विभागात विविध कामांचे भूमिपूजन

**चौक : प्रतिनिधी**

कर्तव्याची जाणीव व सक्षम नेतृत्व आमदार महेश बालदी असल्याने उरण विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा अवतरली आहे, असे गौरवोद्गार भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. २) काढले.

आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने व भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या पाठपुराव्याने मंजूर झालेल्या चौक विभागातील कोट्यवधी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, युवा मोर्चा तालुका सचिव प्रवीण मोरे, चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे, माजी उपसरपंच गणेश कदम, दत्ता मांडे, तुपगावचे सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, बोरगावचे सरपंच प्रितेश मोरे, वावंढळचे सरपंच सुहास कदम, माजी उपसरपंच दीपक पंदेकर, कलोतेच्या सरपंच रेश्मा ठोंबरे, सहाय्यक अभियंता राकेश राखाडे, मिना ठोंबरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर.)**



(छाया : विकास म्हात्रे)

**परिश्रमाच्या फलितामधून वेगळा आनंद** -आमदार महेश बालदी

विकासकामांसाठी आणलेल्या निधीचा विनियोग योग्य आणि गरजेच्या ठिकाणी होत असल्याने याकरिता केलेल्या परिश्रमाचे फलित होत असल्याने एक वेगळा आनंद मिळत असल्याची भावना या वेळी उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की, येत्या काळात मतदारसंघातील प्रत्येक गाव, वाडीत सुविधा पुरविण्यास मी कटिबद्ध असून त्यासाठी सर्वांनी एकत्र येत सहकार्य करावे.

### सरपंच रितू ठोंबरे यांचा वाढदिवस साजरा

चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे यांचा वाढदिवस या वेळी साजरा करण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रशासकीय कामांची माहिती असलेली पुस्तके व गाथा भेट म्हणून त्यांना दिली.



# स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान खपवून घेणार नाही



### मुख्यमंत्र्यांचा थेट इशारा

**ठाणे : प्रतिनिधी**

ज्या काँग्रेस नेते राहुल गांधींनी वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केला त्यांच्यासोबत बसण्याचे पाप काही लोक करीत आहेत, हे आपल्या राज्याचे दुर्दैव आहे, परंतु आम्ही सावरकरांचा अपमान खपवून घेणार नाही. या सरकारमधली कोणतीही व्यक्ती ते खपवून घेणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदे यांनी नाव न घेता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांच्यावर टीका करीत इशारा दिला.

काँग्रेस नेते आणि वायनाडचे (केरळ) माजी खासदार राहुल गांधी हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा सातत्याने अपमान करीत आहेत. या विरोधात भाजप आणि शिवसेना आक्रमक झाले आहेत. दोन्ही पक्षांनी सावरकरांच्या सन्मानार्थ राज्यात गौरव यात्रा आयोजित केली आहे. ठाण्यातही रविवारी (दि. २) ही यात्रा काढण्यात आली. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. या यात्रेच्या समारोपावेळी त्यांनी आपल्या भाषणात विरोधकांना इशारा दिला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे आपण स्वातंत्र्य उपभोगत आहोत. सावरकर हे देशभक्त होते, राष्ट्रभक्त होते, प्रखर हिंदुत्ववादी होते. त्यांचे कार्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी ही यात्रा काढली आहे. पूर्वी लोक हिंदूत्व हा शब्द उच्चारायला कचरत होते, परंतु २०१४नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे हिंदुत्वाचा मान सन्मान जागा झाला.

ते पुढे म्हणाले की, जाणीवपूर्वक हिंदुत्वाला बदनाम करण्याचे काम काही लोक करीत आहेत. सावरकरांचे विचार रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे, पण देशातील हिंदू आता जागा झाला आहे, जागरूक झाला आहे आणि तो सक्रिय झाला आहे, मात्र काही लोक त्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी, त्यांची जागा दाखवण्यासाठी ही सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केल्यामुळे मणिशंकर अय्यर यांना जोडे मारणाऱ्या बाळासाहेब ठाकरेंचा वारसा सांगणारे लोक आता राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत, असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री ठाकरे यांना या वेळी लगावला.

## निवडक

### पीकअप-ट्रकच्या धडकेत पाच ठार, १२ प्रवासी जखमी

**हिसार :** हरियाणातील हिसारजवळील राजगड येथे सालासरहून परतणारे पीकअप वाहन आणि ट्रकची शनिवारी रात्री धडक झाली. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### आयपीएलमध्ये राजस्थानचा हैदराबादवर दणदणीत विजय

**हैदराबाद :** आयपीएलमध्ये रविवारी (दि. २) राजस्थान रॉयल्सने आपल्या पहिल्याच सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर ७२ धावांनी मोठा विजय साकारला. राजस्थानने २०३ धावांचा डोंगर रचला होता. हैदराबादला फक्त १३१ धावा करता आल्या. राजस्थानकडून जोस बटलरने तुफानी अर्धशतक (२२ चेंडूंत सात चौकार आणि तीन षटकारांसह ५४ धावा) केले, तर युजवेंद्र चहलने गोलंदाजीत चमकदार कामगिरी (चार बळी) केली.

## ठाकरेंना धक्का! कट्टर नेते राम गावडे समर्थकांसह करणार भाजपमध्ये प्रवेश

**आळंदी : प्रतिनिधी**

तब्बल ३० वर्षे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासह उद्धव ठाकरेसुद्धा ज्यांना 'शिवसेनेचा राम' म्हणत होते, ते शिवसेनेचे माजी पुणे जिल्हाप्रमुख राम गावडे यांनी अखेर शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करण्याचा निर्णय घेतला आहे. तसे पत्र गावडे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पाठविले आहे.

खेड तालुक्यातील धानोरे येथील शाखाप्रमुखपदापासून राम गावडे यांनी १९९१मध्ये राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली. पक्ष संघटनेतील बहुतेक सर्वच पदांवर काम करून २०१४पासून तब्बल सहा वर्षे पुणे जिल्हाप्रमुख राहिलेले गावडे हे येत्या ५ तारखेला भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. त्यांच्यासोबत समर्थक, गावोगावचे सरपंच-उपसरपंच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश कार्यक्रम होणार आहे.



शिवसेनेचा मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे राज्याच्या सर्वोच्च स्थानी बसूनही सामान्य शिवसैनिकांसह जिल्ह्यातील विकासासाठी काहीच दिले गेले नाही. सतत अवमानाची वागणूक आणि वारंवार बैठका-चर्चा करूनही अंमलबजावणीच होत नसल्याने खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघ तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण भाजपमध्ये प्रवेश करीत आहोत. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर कार्यकर्त्यांची भूमिका लक्षात घेऊन भाजपत जाण्याचा निर्णय घेतला आहे, असे गावडे यांनी स्पष्ट केले आहे.

## विकास निधी खर्च करण्यात रायगड अव्वल

### शंभर टक्के लक्ष्यांक पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**



जिल्हा नियोजन समितीमधील मंजूर वार्षिक निधी खर्च करण्यात रायगड जिल्हा प्रशासनाने सलग दुसऱ्या वर्षी राज्यात अव्वल क्रमांक पटकाविला आहे. रायगड जिल्ह्यासाठी सरत्या आर्थिक वर्षात ३२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्चपर्यंत आपला शंभर टक्के लक्ष्यांक पूर्ण केला.

राज्य सरकारने २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी रायगड जिल्ह्यासाठी ३२० कोटी रुपयांच्या वार्षिक विकास आराखड्याला मंजुरी दिली होती. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये जिल्ह्याला संपूर्ण विकास निधी प्राप्त होत असतो. सर्व सोपस्कार पूर्ण करून ही कामे डिसेंबरपर्यंत मार्गी लागण्याची अपेक्षा असते. राज्यातील सत्तासंघर्षामुळे काही काळ विकासकामांना ब्रेक लागला होता, पण त्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र येत सामंजस्याची भूमिका घेतल्याने निधीचे योग्य वितरण करण्यात आले. शेवटच्या टप्प्यात सात दिवस कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रशासनाची मोठी कोंडी झाली होती. कर्मचारी संपावर असल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प झाले होते. त्यामुळे विकासकामे मार्गी कशी लावायची हा प्रश्न निर्माण झाला होता, पण संप मिटल्याने प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या वर्षी वार्षिक विकास आराखड्यातील शंभर टक्के निधी खर्च करून रायगड जिल्हा राज्यात अव्वल ठरला होता. त्यामुळे या वर्षीही सर्व निधी विकासकामांवर खर्ची पडावा या दृष्टीने जिल्हाधिकारी आणि नियोजन विभागाने तयारी केली होती. सर्व विभाग प्रमुखांच्या वेळोवेळी बैठका घेऊन नियोजित कामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार कार्यवाही झाली.

**संपामुळे कामकाजाचे सात दिवस वाया गेले. तरीदेखील निधी विनियोगात रायगड जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. ३१ मार्चपूर्वी निधी खर्ची टाकण्याच्या दृष्टीने सर्व विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सर्वच विभागांनी प्रयत्न केले. पालकमंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही लक्ष्य पूर्ण करण्यात यशस्वी झालो आहोत.**
**-जयसिंग मेहेत्रे,**
**जिल्हा नियोजन अधिकारी**

# पनवेलचे ग्रामदैवत जाखमातेचा पालखी सोहळा उत्साहात


**पनवेल : वार्ताहर**

पनवेलचे ग्रामदैवत श्री जाखमाता देवीची पालखी परिक्रमा सालाबादप्रमाणे यंदाही शनिवारी (दि. १) मोठ्या उत्साहात ढोलताशाच्या गजरात निघाली. या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



पनवेलकरांचे आराध्यदैवत देवीचे मूळ नाव हे जाखमाता असल्याची नोंद इतिहासात सापडते. नागरिकांची या देवीवर अपार श्रद्धा आहे. या देवीचा दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. ढोलताशाच्या गजरात आणि नाचत-गात संपूर्ण पनवेलमधून फिरून पहाटेपर्यंत देवळात पालखी आणण्याची गेल्या नऊ ते दहा दशकांपासूनची प्रथा आहे. मोठ्या भक्तिभावाने अनेक वर्षांपासून हा पालखी सोहळा साजरा केला जातो. या वेळी देहभान विसरून भाविक पालखीच्या मिरवणुकीत भजन, आरत्या व देवीचा जयजयकार करीत असतात. या सोहळ्यात पनवेलसह परिसरातील देवीचे भक्तही सहभागी होतात.

या वेळी नवस फेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. ठिकठिकाणी जाखमातेचे माता-भगिनींनी स्वागत व औक्षण केले. यानिमित्ताने शहरातील अनेक सामाजिक मंडळांद्वारे पालखीत सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी पाणी व सरबताचे वाटप करण्यात आले. पालखी सोहळा झाल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



## मुंबईत गतिमंद मुलीवर बलात्कार

### नराधम अटकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील मानखुर्द येथे एका अल्पवयीन गतिमंद मुलीवर बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी ३८ वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी ३८ वर्षीय मुन्नालाल माणिकलाल पटवा आणि पीडित ११ वर्षीय मुलगी एकाच वस्तीत राहतात. आरोपीने पीडितेला आधी खायले दिले. त्यानंतर घरी नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## शिवकरमधील तरुणाच्या हत्येचे गूढ उकलले; त्रिकूट गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील शिवकर येथे झालेल्या तरुणाच्या हत्येचा उलगडा झाला आहे. चोरीसाठी आलेल्या आरोपींना या तरुणाने चोरी करताना पाहिल्यामुळे त्याची हत्या केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना गजाआड केले आहे.




शिवकर येथील १९ वर्षीय विनय विनोद पाटील याची पहाटेच्या सुमारास कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना घडली होती. या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली होती. गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने या गुन्ह्याचा उलगडा केला. आरोपी दिनेशकुमार सरोज, वीरेंद्र कुमार सरोज, चंद्रशेखर लालजी हे गुन्ह्याच्या दिवशी पहाटेच्या सुमारास शिवकर गावात कोंबड्या चोरण्यासाठी आले होते. या वेळी ते विनयच्या घरात मोबाईल चोरण्यासाठी शिरले असता विनयला जाग आली. विनयला पाहून आरोपी पळू लागल्याने त्याने पाठोपाठ घरातून बाहेर पडत चोरांचा पाठलाग सुरू केला. या वेळी या तिन्ही चोरट्यांनी विनयला पकडले आणि पोटात चाकूने वार करून जखमी केले. त्यानंतर कुऱ्हाडीनेही शरीरावर वार केला. यामध्ये विनयचा जागीच मृत्यू झाला. थोड्या वेळानंतर वडील आणि बहिणीला जाग आल्यानंतर त्यांनी विनयचा शोध घेण्यास सुरू केला. या वेळी त्यांना तलावाच्या गणपती घाटाजवळ विनयचा मृतदेह आढळला.

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच घटनास्थळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांची वेगळी पथके तयार करून आरोपीच्या शोधात परिसर पिंजून काढत होते. दरम्यान, गुन्हे शाखा कक्ष ३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ कोळेकर व पथकाने समांतर तपास सुरू करून त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे या गुन्ह्यातील तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले व पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. याबाबत पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पुन्हा नरेंद्र मोदीच पंतप्रधान बनणार : अमित शाह

**बिहार : वृत्तसंस्था**

गृहमंत्री अमित शाह यांनी बिहारमधील नवादा येथे जनतेला संबोधित केलं. तेव्हा मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर शाह यांनी टीका केली आहे. नितीश कुमार पंतप्रधान होता होता राहिले. कारण, देशातील जनतेने ठरवलेय, की तिसऱ्यांदाही नरेंद्र मोदीच पंतप्रधान बनणार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर येथील सरकार आपल्याच वजनाने पडेल. त्यानंतर कमळाचे सरकार स्थापन होईल. लोकसभेला ४० च्या ४० जागांवर



उमेदवार निवडून द्या. दंगल करणाऱ्यांना उलटे टांगून सरळ करू, असेही अमित शाह यांनी सांगितलं आहे.बिहारच्या जनतेने ठरवलेय की, लोकसभेच्या ४० ही जागांवर मोदींचे कमळ फुलविणार आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपा आणि जनता दल यूनाइटेड ( जेडीयू ) परत एनडीएमध्ये येईल. तर आताच स्पष्ट करतो की, भाजपाचे दरवाजे जेडीयूसाठी कायमचे बंद झालेत, असा अमित शाह यांनी सांगितलं आहे.

कॉंग्रेस, जेडीयू, आरजेडी, टीएमसी, डीएमके हे सर्व पक्ष राममंदिराला विरोध करत होते. पण, पंतप्रधान मोदींनी राम मंदिराचं भूमिपूजन केले आणि बांधकामाला सुरूवात झाली, असे अमित शाह म्हणाले.

### बिहारमध्ये भाजपचे सरकार येणार!

**गृहमंत्री अमित शाह यांनी बिहारमधील जेडीयू आणि आरजेडी या महागठबंधन सरकारला लक्ष्य केले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर बिहार सरकार पडणार असून त्या ठिकाणी आमचे भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. ज्या सरकारबरोबर जंगलराजच्या लालू प्रसाद यादव यांचा पक्ष आहे, ते सरकार बिहारमध्ये शांती बनवू शकेल का? सत्तेच्या हव्यासापोटी नितीश कुमार लालू प्रसाद यादव यांच्या मांडीवर जाऊन बसले आहेत. पण, महागठबंधनचे हे सरकार आम्ही उखडून टाकू, असेही यावेळी अमित शाह यांनी ठणकावून सांगितले आहे.**

## ..तर मी पहिल्यांदा खासदारकीचा राजीनामा दिला असता –सामंत

**पुणे : रामप्रहर वृत्त**

संजय राऊत यांना ४१ आमदारांनी केलेल्या मतदानामुळे खासदारकी मिळाली आहे. मी जर त्यांच्या जागी असतो तर मी पहिल्यांदा खासदारकीचा राजीनामा दिला असता आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांना सल्ला दिला असता. अशा शब्दात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी संजय राऊत यांना टोला लगावला.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शेंडी जाणव्याचं हिंदुत्व स्वीकारलं नाही. दाढी वगैरे वाढवणं आपल्या धर्मात बसत नाही. त्यामुळे सावरकरांच्या यात्रेत गुळगुळीत दाढी करून एकनाथ शिंदे फिरणार आहेत का? एकनाथ शिंदेंनी सगळ्यात आधी आपली दाढी काढली पाहिजे. असा संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिला आहे. त्या प्रश्नावर सामंत यांनी पुण्यात प्रसारमाध्यमांसमोर भूमिका मांडली. यावेळी सामंत म्हणाले, संजय राऊत यांची दखल केवळ आपण (प्रसार माध्यम) घेता. राज्यातील जनता त्यांची दखल घेत नाही. मी त्यांच्यावर आठ पंधरा दिवसामधून एकदाच भूमिका मांडतो. आम्हाला काम भरपूर असून त्यांना सकाळी साडे नऊ वाजता टीव्ही लावल्यावर तारक मेहता का उलटा चष्मा सारखे असतात. त्यामुळे त्यांच्यावर बोलून कशाला त्यांना मोठ करायचं तसेच सकाळी साडे नऊ वाजता होणारी पत्रकार परिषद ही जातीय तेढ निर्माण करणारी असल्याचं सांगत राऊत यांच्यावर त्यांनी टीका केली.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूलात गतवर्षीच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाला महसूल मिळवून देणारा तिसरा सर्वात मोठा विभाग असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूलात सरत्या आर्थिक वर्षात २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात १७,५०० कोटी रुपये इतका महसूल उत्पादन शुल्क विभागाने मिळवला होता. तर आता, सन २०२२-२३ या सरत्या आर्थिक वर्षात विभागाने २१,५०० कोटी रुपये इतका विक्रमी महसूल राज्याच्या तिजोरीत जमा करण्यात यश मिळवले आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका महसूल राज्याच्या तिजोरीत जमा झाला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मद्यार्कयुक्त आणि अंमली पदार्थांवर उत्पादन शुल्क आकारले जाते. तसेच मद्यार्कयुक्त पदार्थांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यासंदर्भातल्या गुन्ह्यांचे अन्वेषण करण्याचीही जबाबदारी उत्पादन शुल्क विभागाकडे असते. मंत्री शंभूराज देसाई यांनी बनावट मद्यनिर्मिती आणि बेकायदेशीर मद्य वाहतूक व विक्री रोखण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्याकडे लक्ष दिले. तसेच भरारी पथकांना तपासणी नाक्यांवर प्रभावीपणे सक्रीय केले. यामुळे उत्पादन शुल्क विभागात निर्माण झालेले चैतन्य सरत्या आर्थिक वर्षातील २५ टक्के महसुलवाढीच्या रूपाने प्रतिबिंबीत झाले आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्यास वाजे येथून अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील चेरीवली येथून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या तरुणास पनवेल तालुका पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीदाराच्या सहाय्याने वाजे येथून गजाआड केले आहे तसेच त्याच्याकडून अपहृत मुलीची सुखरूप सुटका केली आहे.

गुन्हे

पनवेल तालुक्यातील चेरवली येथून एक १६ वर्षीच्या अल्पवयीन मुलगी हायस्कुला जाते असे सांगुन घराबाहेर पडली, मात्र पुन्हा घरी न परतल्याने तिच्या घरच्यांनी तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण करून पळवून नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल केली होती. घटनेचे गांभार्य ओळखून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अम्बिका अंधारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, पोलीस हवालदार सुनील कुदळे, महेश धुमाळ, प्रकाश मेहर आदींच्या पथकाने यासंदर्भात अधिक तपास करत असताना त्यांना अपहरीत मुलगी एका व्यक्तीसोबत सतत संपर्कात असल्याचे निर्दशनास आले. याप्रकरणी पोलिसांचे एक पथक चौक येथे जावून संशयीत मुलाचे मोबाईलचे तांत्रिक तपास करीत असताना त्यातील मोस्ट कॉलर यास ताब्यात घेऊन गुन्हयाची चौकशी केली असता त्याने एका २३ वर्षीय तरुणाने एका मुलीचे अपहरण करून तिला चौक येथे लपवून ठेवले असल्याचे माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेवून त्याच्याकडून अपहृत मुलीची महिला पोलीस अमलदारांकरवी सुरक्षितरित्या सुटका केली.

## कल्याणमध्ये तंत्रज्ञानाला कोंडून ठेवणाऱ्या डॉक्टराविरोधात गुन्हा

**ठाणे** : कल्याण येथील पश्चिमेतील खडकपाडा भागातील ओम डायग्नोसिस केंद्रातील एका तंत्रज्ञाला याच केंद्रातील एका डॉक्टरने शुक्रवारी रात्री खोलीत कोंडून ठेवले. तंत्रज्ञाने पोलिसांना संपर्क केल्यानंतर पोलिसांनी निदान केंद्रात येऊन त्याची सुटका केली. हा प्रकार करणाऱ्या डॉक्टर विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. डॉ. डी. एस. पाटील (३८, रा. छत्री बंगल्या जवळ, रामबाग, गल्ली क्र. चार, कल्याण पश्चिम) असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. ओम डॉयग्नोसिस केंद्रातील तंत्रज्ञ सुनील महांतप्पा तिळगुळे (३६, रा. जयाबाई बेतुरकर चाळ, खडकपाडा, कल्याण) असे तक्रारदाराचे नाव आहे.

## महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची उल्लेखनीय कामगिरी –खनिकर्ममंत्री दादाजी भुसे

**मुंबई : प्रतिनिधी**

कार्गो हाताळणीमध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डने मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास ३७ टक्के इतकी लक्षणीय वाढ करीत उल्लेखनीय आणि विक्रमी कामगिरी केली आहे. सन २०२२-२३ मध्ये ७१ दशलक्ष टनांहून अधिक मालाची हाताळणी केली असून मागील वर्षी ५२ दशलक्ष टन मालाची हाताळणी झाली होती. याशिवाय प्रवासी जलवाहतूकीत बोर्डाने प्रभावी कामगिरी केली आहे. सागरी उद्योगातील उत्कृष्टतेसाठी बोर्डाची वचनबद्धताच यातून दिसून येते,अशा शब्दात बंदरे व खनिकर्ममंत्री दादाजी भुसे यांनी विभागाचे अभिनंदन केले आहे.

राज्याच्या बिगर-प्रमुख बंदरांचा विकास आणि नियमन करण्याची जबाबदारी असलेले महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आपली कार्यक्षमता सुधारण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. त्याचे प्रत्यंतर यावर्षी दिसून आले आहे. नवीन व्यवसायांना आकर्षित करण्यात आणि त्याचा विद्यमान ग्राहकआधार वाढविण्यात बोर्डाला यश आले आहे. उद्योगातील प्रमुख भागधारक आणि संबंधित घटकांशी



धोरणात्मक भागीदारी प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांमुळेही कार्गो हाताळणीत लक्षणीय वाढ होण्यास हातभार लागल्याचे मंत्री भुसे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सेवा वापरणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ नोंदवली आहे. २०२०-२१ मधील ०.८२ कोटी प्रवाशांवरून २०२१-२२ मध्ये १ कोटी ३६ लाख प्रवासी आणि २०२२-२३ मध्ये १ कोटी ८७ लाखापर्यंत प्रवाशांची संख्या वाढली आहे. कोविड-१९ महामारीमुळे सागरी उद्योगासाठी आव्हानात्मक कालावधीनंतर माल हाताळणी आणि प्रवासी वाहतुकीमध्ये महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाची प्रभावी कामगिरी दिसून येत असून, ही उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

### राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल

***महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाचे यश हे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहे. कारण सागरी उद्योग व्यापार आणि वाणिज्य सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कार्गो हाताळणीतील वाढीमुळे रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतील. ज्यामुळे राज्याच्या वाढीला हातभार लागेल. उद्योगाच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांच्या सुविधा आणि सेवा वाढवण्याच्या योजनांसह, येत्या काही वर्षांत आणखी विस्तार आणि वाढीचा विचार सुरू आहे. उत्कृष्टतेसाठी वचनबद्धतेसह, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड सागरी क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी योग्य स्थितीत असल्याचे मंत्री भुसे यांनी नमूद केले.***

## उरणमध्ये स्वच्छता रॅलीला प्रतिसाद

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ अंतर्गत स्वच्छता शपथ व स्वच्छता रॅली शुक्रवारी (दि. ३१) दुपारी १२.३० वाजता काढण्यात होती. ही रॅली उरण नगरपालिका येथून सुरू करण्यात आली. रॅली सुरू होण्याआधी नगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ अंतर्गत उरण नगरपालिका सी.ओ.मा. अनिल जगदाने यांनी नगरपालिका सभागृहात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामुदायिक प्रतिज्ञा घेतली.

महाराष्ट्र माझा आहे. माझा महाराष्ट्र स्वच्छ ठेवणे माझे प्रथम कर्तव्य आहे. मी कचराकुंडीचा वापर करीन. सुका, ओला कचरा वेगळा करीन. सार्वजनिक ठिकाणी थुंकणार नाही. माझे घर, माझा परिसर, विभाग, कार्यस्थळ स्वच्छ ठेवेन. प्लास्टिक पिशवी मागणार नाही, अशी शपथ घेतली. त्यानंतर उरण नगरपालिका येथून रॅली काढली.

उरण नगरपालिका ते नगराजशेठ चौक ते जुना फुल मार्केट मार्गे गांधी चौक ते राजपाल नाक्यावरून विमला तलाव गार्डन येथून रॅली काढण्यात आली. नगरपालिका कर्मचारी हातात फलक घेऊन नागरिकांना स्वच्छतेबाबत जागृत करत होते. कार्यक्रमासाठी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, प्रशासकीय अधिकारी अनिल जगदाने, लेखापाल सुरेश तांडेल, नगर रचना सहायक सचिन भानुसे, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सलीम दुर्रानी यांना उपमुख्यमंत्री फडणवीसांकडून श्रद्धांजली

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघातील माजी अष्टपैलू खेळाडू सलीम दुर्रानी यांच्या निधनाची बातमी समजून दुःख झाले. त्यांच्या खेळाने भारतीय जनमानसाला क्रिकेटचे वेड लावले होते, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.



उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आपल्या संदेशात म्हणतात, आज क्रिकेट विश्वात भारताने आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे, हे स्थान प्राप्त करण्यात ज्या क्रिकेटपटूंचे योगदान लाभले, त्यात सलीम दुर्रानी यांचे स्थान अग्रस्थानी आहे. प्रेक्षक षटकाराची मागणी करत आणि ते चेंडू सीमारेषेबाहेर भिरकावून देत. त्यांच्या निधनाने क्रिकेट क्षेत्राचा एक मोठा मार्गदर्शक हरपला आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना प्राप्त होवो. सलीम दुर्राणी यांचा जन्म अफगाणिस्तानमध्ये झाला होता आणि ते अनेक वर्षे भारतासाठी क्रिकेट खेळले. यासह दुर्रानी हे अर्जुन पुरस्काराने सन्मानित होणारे पहिले भारतीय क्रिकेटपटू ठरले आहेत.

पान १ वरून

### उरण मतदारसंघात विकासाची गंगा

आपल्या भाषणात आमदार महेश बालदी यांनी थंड हवेचे ठिकाण माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या हाशाची पट्टी व इतर दुर्गम, डोंगराळ ठिकाणच्या वाड्यांना भेडसावणारे प्रश्न सोडविण्यासाठी येत्या आठ दिवसांत वनमंत्री व संबंधित खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली असून तेही प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी लोधिवली मुख्य रस्ता, तुपगाव येथे गेली अनेक वर्षे रस्त्यापासून वंचित असलेला स्मशानभूमी रस्ता व जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना, हातनोली गावासाठी गणेश घाट बांधणे, वावंढळ गाव रस्ता, कलोते रस्ता, पोखरवाडी, आंबेवाडी, बोरगाव, काटवन रस्ता, तारावाडी नळ पाणीपुरवठा योजना, चिचमाळ, निगरपट्टी, निंबरवाडी, टेपाचीवाडी, दांडवाडी, बुरुजवाडी व बापदनवाडी या आदिवासी व दुर्गम भागात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला.

## मुरूडचा समुद्रकिनारा पर्यटकांनी बहरला

### ताज्या मासळीचा मात्र तुटवडा, लोक नाराज

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुड शहरात सकाळी थंडी तर दुपारी गरम असे वातावरण सध्या असल्याने रविवारी पर्यटक मुरुडच्या किनाऱ्यावर येणे पसंत करत आहेत. परंतु मासळी बाजारातून मासळी गायब झाल्याने पर्यटक नाराज असल्याचे चित्र दिसत आहे.

उन्हाळी सुटीत विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी राहणार आहे. तसेच लागून आलेल्या वीकएण्डमुळे पर्यटनप्रेमींना मोठा लाभ झाला असून मुरुड शहरात वातावरण आल्हाददायक व सुंदर आहे. समुद्रातील वातावरण खराब असल्याने मासेमारी होत नसल्याने बाजारात मासळी मिळत नाही.

मुरुड समुद्रकिनारी असलेली हॉटेल उन्हाळी सुटीसाठी सज्ज झाली आहे. सर्व हॉटेल रंगरंगोटी, विविध रंगाची रोषणाई, नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टॉल, किनाऱ्यावर घोडेस्वारी, मोटार बाईक, पाणीपुरी, भेळ पुरी अशा विविध स्टॉलनी किनारा बहरला आहे.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेली विश्राम धाम या बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ दिवाळीत येणाऱ्या पर्यटकांना होणार आहे.

पालिकेचे कर्मचारी समुद्रकिनारी दिवसातून ३ वेळा स्वच्छ करतात. मुरुडला असणारे जलदुर्ग जंजिरा व पद्ममदुर्ग पर्यटकांसाठी सज्ज झाले आहेत.. मुरुडपासून जवळच असणारे गारंबी धारण, कुडे मांदाड लेणी, खोकरी, दत्तमंदिर या पर्यटन स्थळावर स्वछता करून खाण्यापिण्याचे स्टॉल करण्यात आले आहेत. विकएण्ड असल्याने पर्यटकांसाठी मुरुड तालुका सज्ज झाला आहे.

**रविवार सुटीसाठी मुरुड तयार आहे. पिण्याचे पाणी, शहरातील रस्ते व समुद्र किनाऱ्याची स्वछता याकडे जातीने लक्ष दिल्याने पर्यटकांना त्रास होणार नाही. पर्यटकांनी समुद्रात जाताना भरती ओहोटी याचे भान ठेऊन समुद्राच्या लाटांचा सुरक्षित आनंद घ्यावा.**

**–पंकज भुसे**, मुख्याधिकारी, मुरूड नगरपालिका

**गेली २ वर्ष कोरोना मुळे हॉटेल वैवसाय डबघाईला आला होता .ह्या वर्षी उन्हाळी सुटीत बुकिंग चांगली आहे .पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात मुरुडला यावे आम्ही त्यांना ऊत्तम सेवा देऊ व हॉटेल भाडे देशील योग्य दारात घेऊ .पर्यटकांनी ४ दिवस राहण्यासाठी यावे.**

**–किशोर धामसकर,** हॉटेल व्यावसायिक



## ग्रामीण भागात पापड करण्याची लगबग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने खारवड्या, कुरडई, पापड, बटाटा वेफर्स, शेवया आदी उन्हाळ्यात बनवल्या जाणाऱ्या पदार्थांची लगबग ग्रामीण भागातील महिलांमध्ये दिसत आहे. मध्यंतरी बदलत्या हवामानामुळे कधी थंडी; तर कधी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे हे पदार्थ बनवण्यास अडचणी निर्माण होत होत्या. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून यासाठी पापड बनवण्याची लगबग ग्रामीण महिलांमध्ये दिसत आहे.

कृषिप्रधान देशात खारवडी, कुरडई, बटाटा वेफर्स, शेवया, पापड हे पदार्थ खास प्रक्रिया करून भारतीय पद्धतीनुसार करून सुकवून ते पुढे वर्षभर वेगवेगळ्या सणावारांना खाण्याची प्रथा आहे. खारवाडी, कुरडई हे कुरकुरीत करण्याची पद्धत ही कष्टदायी व मेहनतीची आहे. त्यासाठी दोन दिवस तांदूळ भिजत ठेवणे, ओले तांदूळ करून सुकवणे, नंतर ते दळून पीठ तयार केले जाते. तयार झालेले पीठ शिजवून घेऊन सकाळी सकाळीच पातळ पीठ अंगणात प्लास्टिक अंथरून त्यावर चमचाच्या सहायाने टाकून सुकवण्यात येतात. कुरडई साच्याच्या सहायाने टाकून सुकल्यानंतर वर्षभरासाठी साठवून ठेवण्यात येतात. अशाच पद्धतीने गव्हाच्या पिठाच्या शेवया, उडीद पापड, ज्वारी, नांगली, तांदूळ, साबुदाणा यांचेही पापड तयार होतात.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा झंझावात

# पनवेल, उरणमध्ये रस्ते विकासाला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-दिल्ली एक्स्प्रेस वे ला जोडणारा जेएनपीटी-मोर्बे मल्टिमॉडेल कॉरिडॉर निर्माण करण्यात येणार आहे. रस्ते विकास महामंडळाकडून यासाठीची भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असून या कॉरिडॉरमुळे न्हावा-शेवा ते दिल्ली हे अंतर फक्त २२ तासांमध्ये कापता येणार आहे. ४१४.६८ कोटी मूल्य असलेल्या तीन प्रकल्पांचा भूमिपूजन सोहळा मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते खारपाडा टोल प्लाझा येथे झाला. त्या वेळी मंत्री गडकरी यांनी १३ हजार कोटी रुपयांच्या मोरबे-करंजाडे रस्त्याच्या बांधकामाची घोषणा केली, जो जेएनपीटी बंदरातून जाईल आणि मुंबई ते दिल्ली अंतर कापण्यासाठी लागणारा वेळ १२ तासांपर्यंत कमी करेल. १,२०० कोटी रुपयांच्या कळंबोली जंक्शन आणि १,१४६ कोटी रुपयांच्या पागोटे जंक्शनचे कामही लवकरच सुरू होईल, असेही ते म्हणाले.



पनवेल आणि उरण परिसराचा झपाट्याने विकास होत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे जेएनपीटी बंदर या परिसरात आहे. या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात मालाची आयात-निर्यात केली जाते. दळणवळणाच्या दृष्टिकोनातून हे बंदर अत्यंत महत्त्वाचे आहे. न्हावा-शेवाला माल अत्यंत जलदगतीने घेऊन येण्यासाठी त्याचबरोबर तेथून नेण्यासाठी चांगल्या रस्त्याची आवश्यकता आहे. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ बी चे ३००० कोटी रुपये खर्च करून रुंदीकरण आणि विस्तारीकरण करण्यात आले आहे. जेएनपीटी महामार्ग पूर्णपणे कॉंक्रीटीकरण करण्यात आला आहे. बाजूने सर्व्हिस रोड तयार करण्यात आले आहेत. आता त्याला जोडण्यासाठी पागोटे-चौक हा ग्रीनफिल्ड रोड तयार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रस्तावित मुंबई-दिल्ली द्रुतगती महामार्गाला जोडण्यासाठी जेएनपीटी-करंजाडे-मोर्बे हा बारा पदरी महामार्ग तयार करण्यात येणार आहे.

याकरिता आवश्यक असणारे भूसंपादन रस्ते विकास महामंडळाकडून हाती घेण्यात आले असून सर्वेक्षणामध्ये नेमके किती क्षेत्र बाधित होईल याबाबतची आकडेवारी उपलब्ध होणार आहे. या कामासाठी नुकतीच एजन्सी नियुक्त करण्यात आली असून या प्रकल्पामुळे पनवेल आणि उरणच्या विकासामध्ये आणखी भर पडणार आहे.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी कनेक्टिव्हिटी

*नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जेएनपीटी-मोर्बे मार्गाची कनेक्टिव्हिटी असणार आहे. या विमानतळावर कार्गोची सुविधा असल्याने साहजिकच हवाई मार्गाने मालवाहतूक होणार आहे. यामुळे हा मल्टिमॉडेल कॉरिडॉर नवी मुंबई विमानतळाला जोडण्यात आला आहे.*

### १३००० कोटींचा अपेक्षित खर्च

अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या या मल्टिमॉडेल कॉरिडॉरसाठी १२५७०.६२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. जवळपास १३ हजार कोटी रुपये खर्च या प्रकल्पासाठी येणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे संयुक्तपणे हा प्रकल्प उभारणार आहेत. याकरिता येणारा खर्च केंद्र व राज्य सरकार मिळून करणार आहे.

### *कळंबोली सर्कलही लवकरच होणार विकसित*

***कळंबोली सर्कल हे मोठे वाहतूक बेट असल्याने याठिकाणी वाहनांची वर्दळ सुरू असते. एकत्र महामार्ग याठिकाणी येत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. विशेषता कामोठे एमजीएम समोर वाहनांच्या रांगा लागतात. यामुळे पनवेलकरांसह इतरांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जंक्शन इम्प्रूवमेंट व्हावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यानुसार कळंबोली सर्कलचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे डिझाईन पूर्ण झाले आहे. एप्रिल महिन्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करून कामास सुरुवात केली जाणार असल्याची माहिती गुरुवारी केंद्रीय मंत्री गडकरी यांनी मुंबई गोवा महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूर रस्त्याच्या कॉंक्रेटीकरणाच्या कार्यक्रमात दिली.***

# खारघरमध्ये प्रथमच एचपीव्ही लसीकरण

### मान्यवरांची उपस्थिती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नमो नमो मोर्चा, सखी वूमन्स वेल्फेअर आणि सीपीए यांच्या संयुक्त विद्यमाने एक पाऊल भावी पिढीच्या सुरक्षिततेकडे हे सामाजिक हिताचे घोषवाक्य घेऊन खारघरमध्ये प्रथमच सेक्टर १८ येथे गर्भाशयाच्या कॅन्सरवर मोफत प्रतिबंधक एचपीव्ही लसीकरण उपक्रमाचे आयोजन रविवारी (दि. २) करण्यात आले होते. ९ ते २० या वयोगटातील मुली-महिलांनी याचा लाभ घेतला.







भाजप खारघर तळोजा मंडळाच्या सहकार्याने झालेल्या या उपक्रमास भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी नगरसेवक विक्रांत पाटील, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, ॲड. नरेश ठाकूर, प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, दिलीप जाधव, राजेंद्र मांजरेकर, अजय माळी, संतोषकुमार शर्मा, जय विभांडिक, संदीप कासार, शैलेंद्र त्रिपाठी, साधना पवार, अश्विनी भुवड, संध्या शारबिद्रे, प्रिया दळवी, स्मिता आचार्य, नेत्रा पाटील, गीता चौधरी, बिना गोगरी, मीनाक्षी अंथवाल, निर्मला यादव, चांदणी अवघडे, डॉ. नीलम विसपुते, स्नेहल बुधाई, प्रीती शर्मा, सिद्धी शर्मा, मुसरत अन्सारी, शोभा मिश्रा, रिचेल मेहता, सायली विसपुते, दीपा ओझा, डॉ. धनंजया, डॉ. रुद्रा बिरारी, डॉ. निखिल भारंबे, डॉ. प्रिया, डॉ. राम क्षार, डॉ. विवेक तिवारी, अमित बोधाई, सिस्टर शितल कदम, प्रतीक्षा गुरव, दिपाली, जनरेशन स्कूलचा कर्मचारी वर्ग, नमो नमो मोर्चा भारत राष्ट्रीय अध्यक्ष सत्यप्रकाश सिंग, उपाध्यक्ष आर. के. दिवाकर, नमो नमो भारत मोर्चा संघटन सरचिटणीस सोपान मुंडे पाटील, डॉ. सतीश खर्डे, वैभव घोसाळकर, अखिलेश चौबे, प्रा. सुनील करपे, संजना कदम, सिद्धी मोरे, गुंजा बेलतुरकर आदी उपस्थित होते.




**पनवेल : उसर्ली येथे गुरुवर्य रामचंद्र महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाने श्री विठ्ठल रखुमाई उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यंदाचे या सोहळ्याचे २५वे वर्ष होते. सोहळ्यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत या सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ह.भ.प दिलीप महाराज यांनी काल्याचे कीर्तन सादर केले. उसर्ली येथे सुरू असलेल्या या सोहळ्याला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी रविवारी भेट देत विठ्ठल रखुमाईचे मनोभावे दर्शन घेतले.**
**या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये मोकळ्या भूखंडाची साफसफाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांनी समस्येचे गांभीर्य ओळखून पनवेल प्रभाग १८ येथे एका मोकळ्या भूखंडाची साफसफाई आणि सपाटीकरण करवून घेतले.



प्रभाग १८ मधील अशोक बाग समोरील मोकळ्या भूखंडावर पावसामुळे मोठे गवत आणि झाडे झुडपे वाढली होती, त्यामुळे लगतच्या सोसायटीमध्ये साप, मुंगूस आणि इतर जनावरांचा शिरकाव होत होता. यामुळे सोसायटीच्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सोसायटीच्या रहिवाशांनी कार्यक्षम माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयात जाऊन भेट घेतली आणि आपली समस्या सांगितली. यावर तत्परतेने विक्रांत पाटील यांनी जेसीबी लावून दलदलीचा काही भाग सोडून प्रथम झाडेझुडपे साफ करून घेतले.

यासोबतच त्या भूखंडावरील मातीचा ढिगारा काढून जागेचे व्यवस्थित सपाटीकरण करून घेतले.

## निवडक

### रेल्वे स्टेशनजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील लोकल लाईन समोरिल रिक्षा स्टॅन्ड जवळ एका अनोळखी इसमाचा मृत आढळला असून पनवेल रेल्वे पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ वर्षे असून उंची पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंग गहूवर्ण, डोकीचे केस काळे पांढरे वाढलेले, नाक सरळ, चेहरा उभट तसेच अंगात निळा टी शर्ट व निळी फुल पॅन्ट आतमध्ये राखाडी हाफ पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस (०२२-२७४६७१२२) किंवा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बी. व्ही. दोडमिसे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### भाई सांगारे यांचा २४वा स्मृतीदिन

**पनवेल :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे यांच्या अध्यक्षतेखाली दलित पँथरचे नेते भाई सांगारे यांचा २४ वा स्मृतीदिन वडाळा येथे पक्षाच्या मुख्य कार्यालयात झाला. भाई संगारे हे मनोज संसारे यांना आपला मानसपुत्र मानत होते. भाई संगारे यांनी आपल्या जीवनात अनेक आंबेडकरी चळवळीचे नेते व कार्यकर्ते घडवले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरी चळवळीसाठी समर्पित केले होते. त्यांच्या २४ व्या स्मृती दिनाच्या कार्यक्रमाकरिता महासचिव अशोक वाघमारे, संघटक भगवान गरुड, वरळी विभागाच्या अध्यक्षा रेणुका तांबे, युवा नेते अनिकेत संसारे, रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व भाई संगारे यांच्या जीवन चरित्राची आणि त्यांच्या कार्याची माहिती उपस्थित कार्यकर्त्यांना करून दिली.

# रमजान महिन्यानिमित्त गरजूंना पोषक आहार किटचे वाटप

### भाजप नेते सय्यद अकबर यांच्यातर्फे उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड प्रभारी, 'कोकण डायरी'चे संपादक सय्यद अकबर यांच्या वतीने पनवेल नवनाथ नगर वसाहतीत मुस्लिम समाजातील गरीब, गरजू परिवारांना पोषक आहार किटचे वाटप करण्यात आले.

रमजान उपवासात पोषक आहार मिळावा म्हणून तांदूळ, तेल, तूप, पीठ, कडधान्य, खजूर, शेवई, शीतपेय असे विविध सामग्री असलेला किट उपहार म्हणून देण्यात आले. या वेळी सय्यद अकबर यांच्यासह भाजप प्रदेश सदस्य साबिर शेख, उद्योजक अमजद खान, 'कोकण डायरी'चे रायगड ब्युरो चिफ इरफान शेख, हजरत बद्रुद्दीन शाह बाबा दर्ग्यातील मुजावर परिवार आदी उपस्थित होते. यंदाची रमजान ईद सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी देणारी ठरो यासाठी सामूहिक प्रार्थनाही करण्यात आली.

# नवीन पनवेलमध्ये चैत्रगौरी हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षा आणि पनवेल महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत आणि स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चैत्र गौरी हळदीकुंकूनिमित्त नवीन पनवेल येथील आई एकविरा माता मंदिरामध्ये महिलांसाठी 'दुर्गा सप्तशतीचे पाठ वाचन' चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी परिसरातील महिला वर्गाने मोठ्या भक्तिभावाने यामध्ये सहभाग घेत दुर्गा सप्तशतीचे पठण केले.



नवरात्रीमध्ये दुर्गा सप्तशती पठणामुळे देवीचे शुभाशिर्वाद आणि कृपादृष्टी लाभते. अनेक संकटातून बाहेर पडण्यास यामुळे मोलाची मदत होते असे मानले जाते. दुर्गा सप्तशतीमधील अध्याय पठणाचे विविध लाभ मिळतात तसेच भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होऊ शकतात, अशी लोकमान्यता आहे. त्यानुसार नवीन पनवेल सेक्टर १६ आदिवासीवाडा येथील आई एकविरा माता मंदिरामध्ये भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षा आणि पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत आणि स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'दुर्गा सप्तशतीचे पाठ वाचन' चे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी परिसरातील महिला वर्गाने मोठ्या भक्तिभावाने यामध्ये सहभाग घेत दुर्गा सप्तशतीचे पठण केले. यावेळी माजी नगरसेविका राजश्री वावेकर, भाजप उत्तर रायगड जिल्हा सदस्या सरोज मोरे, मुक्ताई भजन मंडळ अध्यक्षा अनिता मोरे, वैशाली पाटील, मीनाक्षी थळी, शिवानी रावते, विदुला विशे, अलका पेशट्टीवार, पवार मॅडम, शिंदे मॅडम यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# उरण-खारकोपर लोकलची आज दुसरी चाचणी

**उरण : वार्ताहर**

नवी मुंबईला जोडणाऱ्या उरण ते खारकोपर लोकलचा मार्ग १५ एप्रिलला सुरू होण्याची शक्यता आहे. त्यासाठी सोमवारी (दि. ३) या मार्गावर पुन्हा एकदा चाचणी होणार आहे. या वेळी उरण ते खारकोपर मार्गावरील सुविधा, अडचणी यांचा आढावा घेण्यात येणार असल्याची माहीती रेल्वेच्या सुत्रांकडून मिळाली आहे. मार्ग सुरू होण्याची चिन्हे निर्माण झाल्याने सध्या या कामांना वेग आला आहे.




उरण स्टेशन परिसरात सध्या रेल्वेचा भोंगा वाजू लागल्याने उरण ते खारकोपर हा लोकल रेल्वे मार्ग सुरू होण्याची प्रचंड उत्सुकता आणि उत्कंठा उरणकारांना लागली आहे. ही सेवा लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी इच्छा उरण मधील प्रवासी व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे, मात्र उरण ते खारकोपर मार्गावरील रेल्वे रूळ आणि त्याची तपासणी रेल्वेच्या सुरक्षा विभागाने चाचण्या केल्या आहेत. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी तयार असल्याचा अहवाल ही रेल्वेला विभागाला सादर केला आहे, परंतु आजपर्यंत या मार्गावरील उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, रांजणपाडा व गव्हाण या रेल्वे स्थानकांची कामे अपूर्ण आहेत. यामध्ये उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व रांजणपाडा येथील पार्किंगची तसेच येथील प्रवाशांसाठी प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठीच्या मार्गाची कामे अपूर्ण आहेत. यामध्ये द्रोणागिरी स्थानकांच्या अंडर ग्राऊंडची कामे अपूर्ण आहेत.

# गॅरेजमध्ये काम करणाऱ्या बालकामगाराची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तलयाअंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कामोठे सेक्टर २० मधील गॅरेजवर छापा मारून एका बाल कामगाराची सुटका केली. तसेच या बाल कामगाराला कमी वेतनात अति श्रमाचे काम देऊन त्याला राबवून घेणाऱ्या गॅरेज मालकांवर गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले.

कामोठेमध्ये एका बाईक गॅरेजमध्ये बाल कामगारांना कामावर ठेवून त्यांच्याकडून अतिश्रमाचे काम करून घेण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांना तो मुलगा तेथे काम करत असल्याचे आढळून आले. त्यानंतर गॅरेज मालक अल्पवयीन मुलाला गेल्या काही महिन्यापासून कमी वेतनात राबवून घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक भरगुडे व त्यांच्या पथकाने छापा मारत गॅरेजमध्ये काम करणाऱ्या १६ वर्षे अल्पवयीन मुलाची सुटका केली.

# उरण भवरा येथील तलावात आढळला तरुणीचा मृतदेह

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील मोरा रोडवरील भवरा येथील तलावात शनिवारी (दि. १) १: ३० वाजताचे सुमारास रस्त्यावर जाणाऱ्या एका व्यक्तीला तलावात मृतदेह तरंगत असल्याचे दिसून आले असता त्यांनी त्वरित ११२ या क्रमांकावर पोलिसांबरोबर संपर्क साधून या घटनेची माहिती पोलिसांना दिली.

माहिती मिळताच पोलीस त्वरित घटनास्थळी पोहचले. मृतदेह तलावात असल्याकारणाने पोलिसांनी सिडको अग्निशामक दलाच्या मदतीने मृतदेह तलावाच्या बाहेर काढला, असता हा मृतदेह एका तरुणीचा असल्याचे लक्षात आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ निर्माण झाली असून तरुणीची हत्या की आत्महत्या, याबाबत सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे. मृतदेह तलावातून बाहेर काढल्यावर आजूबाजूला पोलिसांनी चौकशी केली असता या मृत तरुणीचे नाव मनाली दत्तात्रेय जाधव (वय ३०) असल्याचे समजले असून, ही तरुणी भवरा येथील स्थानिक रहिवासी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

तरुणीने आत्महत्या असावी असा प्राथमिक अंदाज असला तरी मनालीची हत्या की आत्महत्या याबाबत परिसरात मात्र चर्चेला उधाण आले आहे. या घटनेचा पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उरण मोरा सागरी पोलीस ठाण्यातील हवालदार एस. आर. वसावे व त्यांचे सहकारी अधिक तपास करीत आहेत.

## संपादकीय

# अस्मितेचा मुद्दा

महाराष्ट्रातील रविवारचा दिवस राजकीयदृष्ट्या प्रचंड धावपळीचा ठरला. एकीकडे छत्रपती संभाजीनगरात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी वज्रमूठ सभेचे आयोजन केले होते, तर दुसरीकडे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेने मिळून संयुक्तपणे वीर सावरकर गौरव यात्रा राज्यभर सुरू केली. यातील वीर सावरकर गौरव यात्रेला राजकीय डावपेच म्हणणे हे अपरिपक्वतेचे लक्षण आहे. कारण सावरकर हा मुद्दा महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय आहे.

**काँग्रेसचे माजी खासदार राहुल गांधी यांनी यापूर्वीही अनेकदा सावरकरांचा अपमान केला आहे. ‘मोदी’ या आडनावाचा उल्लेख करून राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अपमान केल्याप्रकरणी सुरत सत्र न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर संसदेने त्यांची खासदारकी रद्द केली. खासदारकी रद्द झाल्यानंतर तरी राहुल गांधी या जातिवाचक उल्लेखाबद्दल माफी मागतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. परंतु तेव्हाही काहीही कारण नसताना, माफी मागायला मी काही सावरकर नाही, गांधी आहे आणि गांधी कधीही झुकत नाहीत, असे विधान राहुल गांधी यांनी केले. स्वाभाविकपणे त्यांच्या या वक्तव्यामुळे संपूर्ण देशभरातील सावरकरप्रेमी नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. या वक्तव्याबद्दल राहुल गांधी यांचा निषेध करण्यासाठी भाजप आणि शिवसेनेकडून वीर सावरकर गौरव यात्रेचे आयोजन करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. त्यानुसार रविवारपासून राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली असून ६ एप्रिलपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे. जिल्हे, तालुके, विधानसभा मतदारसंघ तसेच गावागावातून ही यात्रा काढली जाईल. सावरकरांची राष्ट्रभक्ती व त्याग या यात्रेतून पुन्हा समाजासमोर आणला जाणार आहे. सावरकरांनी आयुष्यात कधीही ब्रिटिशांची माफी मागितली नाही. सावरकरांविषयीच्या अभ्यासकांनी तसेच त्यांच्या परिवारातील व्यक्तींनी वेळोवेळी हे स्पष्ट करूनही राहुल गांधी वारंवार त्यांचा उल्लेख ‘माफीवीर’ असा करतात. सावरकरांनी तुरुंगातून ब्रिटिश अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रांचा पुरावे म्हणून उल्लेख करीत राहुल गांधी त्याला ‘माफी मागितली’ असे संबोधतात. झोपी गेलेल्याला जागे करता येते, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला कसे जागे करणार? राहुल गांधी यांचे वर्तन तसेच काहिसे आहे. महाराष्ट्रातील राजकारण सावरकर गौरव यात्रेमुळे सध्या ढवळून निघाले असले तरी ज्यांच्यासाठी ही यात्रा सर्वात उपयुक्त ठरेल त्या काँग्रेसीजनांनी मात्र साऱ्यातून अंगच काढून घेतलेले दिसते. छत्रपती संभाजीनगरातील वज्रमूठ सभेतून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले ऐनवेळेला गायब दिसले. त्यामुळे वज्रमूठ सभेचे काय झाले हे वेगळे सांगायची गरज नाही. वीर सावरकरांचे महत्त्व माजी खासदार राहुल गांधी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पटवून देणे ही अवघड बाब आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कान टोचून देखील काही उपयोग झालेला नाही. वीर सावरकरांबद्दल वेडेवाकडे बोलले की झटक्यात प्रसिद्धी मिळते आणि भाजपसारख्या राष्ट्रवादाने प्रेरित पक्षाच्या कार्यकर्त्यांना सहज डिवचता येते हा साधासरळ हिशेब सावरकरांवरील टीकेच्या मागे आहे. त्यात पक्षीय धोरण वगैरे काहीही नाही. वीर सावरकरांचा मुद्दा भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने लावून धरल्यामुळे काँग्रेसला एक पाऊल मागे जावे लागले हे उघड आहे.**

# कर्जतमधील आरोग्य यंत्रणा सुधारण्याची आवश्यकता






कर्जतमध्ये एक चांगले सुसज्ज हॉस्पिटल व्हावे यासाठी माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांनी चाळीस वर्षांपूर्वी प्रयत्न केले होते. मात्र प्रशासनाचे उदासीन धोरण तसेच प्रतिष्ठेमुळे ते होऊ शकले नाही. सध्या असलेले उपजिल्हा रुग्णालय हे प्रथमोपचार केंद्र ठरले आहे. कारण तेथे आलेल्या रुग्णाला ’पुढे’ पाठवण्यावरच जास्त भर असतो. त्यामुळे सर्व सामान्य रुग्णांना ते परवडणारे नसते त्यामुळे अनेक जणांचे जमवा-जमाव करतानाच प्राण गमवावे लागतात. अशी अनेक उदाहरणे आहेत.

**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत शहरात २००४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आचार संहितेच्या भीतीने काम पूर्ण न झालेल्या कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे घाई घाईत उद्घाटन करण्यात आले. २ कोटी ३२ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयामुळे आता कर्जतकरांचे आरोग्य ठणठणीत होईल असे वाटले होते. परंतु आजपर्यंत तेथे मंजूर पदे पूर्णपणे भरली नाहीत. अद्ययावत उपकरणे, प्रशस्त जागा असूनही तज्ञ डॉक्टरांअभावी हे उपजिल्हा रुग्णालय अनेक वेळा सलाईनवर ठेवावे लागले आहे. त्याचे कारण सात वैद्यकीय अधिकारी मंजूर असताना प्रत्यक्ष तीनच डॉक्टर कार्यरत आहेत. एक भूल तज्ञ आणि एक बाल रोग तज्ञ प्रति नियुक्तीवर अलिबाग जिल्हा रुग्णालयात पाठवले आहेत. तर आरोग्य सेविकांची वानवा आहे. ठेकेदारी पद्धतीने काम करणाऱ्या आरोग्य सेविका सुद्धा कमी केल्याने उपकेंद्रांमध्ये काम कसे करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नव नवीन उपकरणे आणण्यात आली त्यातील काही अन्य ठिकाणी नेण्याचे प्रकारही झाले. या रुग्णालयात चांगली आरोग्य सेवा मिळावी म्हणून अनेक राजकीय पक्षांनी व समाज सेवी संस्थांनी उपोषणे, आंदोलने केली. त्यामध्ये पत्रकार संघटना सुद्धा मागे राहिल्या नाहीत. परंतु काहीच उपयोग झाला नाही. मात्र एखाद्या गुन्ह्यात अडकलेल्या राजकीय पुढाऱ्यास मात्र छाती दुखत असली तरी त्याची चांगली ‘सेवा’ केली जाते हे विशेष साध्या रुग्णांना प्रथमोपचार करून पुढे पाठवण्यात येते. काही अडलेल्या महिलांची बाळंतपणे पुढे उपचारासाठी नेत असताना रुग्णवाहिकेतच अगदी नॉर्मल झाल्याची उदाहरणे आहेत. खरे तर तालुक्याचे महत्वाचे आरोग्य केंद्र म्हणून कर्जत उपजिल्हा रुग्णालयाकडे पाहिले जाते. हे उपजिल्हा रुग्णालय शंभर खाटांचे केल्यास १४ वैद्यकीय अधिकारी तेथे असतील आणि निश्चितच कर्जत तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सुधारेल यात शंका नाही.

कोरोनाच्या काळात कर्जत उपजिल्हा रुग्णालयाने चांगले काम केले आहे. आमदार महेंद्र थोरवे यांचे त्याकडे जातीने लक्ष होते. त्यामुळे काहीही हवे असेल ते आमदार थोरवे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत असत आणि लवकरात लवकर उपलब्ध करून देत असत. कोरोना लस तर अगदी सहज उपलब्ध होत होती. मुंबई, ठाणे, कल्याण तसेच पेण, पनवेल, खालापूर तालुक्यातून सुद्धा लस घेण्यासाठी नागरिक येत असत. कोरोना आटोक्यात आला आणि उप जिल्हा रुग्णालयाचा कारभार सुद्धा धीमा झाला आहे. गेल्याच आठवड्यात एका गरोदर महिलेची उपचारविना हेळसांड झाली आणि तिचे बाळ दगावले होते. काही वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये असलेले हेवे-दावे या प्रकारामुळे रुग्णांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यातच अनेक वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी रहात नाहीत. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना तेथे राहण्यासाठी सक्तीचे केले पाहिजे.

कर्जत तालुक्यात कशेळे येथे एक ग्रामीण रुग्णालय आहे तर नेरळ, कडाव, कळंब, मोहिली, आंबिवली, आणि खांडस ही सहा प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत आणि ३८ उप आरोग्य केंद्रे आहेत त्या पैकी काही उप आरोग्य केंद्र बंदच आहेत. कशेळे ग्रामीण रुग्णालयाचा आधार आदिवासी भागातील लोकांना वाटतो परंतु अद्यापही तेथे काही पदे रिक्त आहेत. कडाव प्राथमिक आरोग्य केंद्रातही अनेक अडचणी आहेत. काही वर्षांपूर्वी ३८ उप आरोग्य केंद्रांपैकी सुमारे २५ आरोग्य केंद्रे बंद असल्याचे सर्वेक्षण दिशा केंद्र या स्वयंसेवी संस्थेने केले होते. त्यामध्ये भयानक परिस्थिती समोर आली होती. गौरकामत उप केंद्रात एका परिचारिकेचा मृत्यू झाला त्यामुळे तिचे भूत तेथे संचार करते म्हणून तेथे कुणी राहत नाही. असेही घडले होते.

भालीवडी उपकेंद्राची इमारत अपूर्ण आहे मात्र पूर्ण निधी खर्ची झाल्याचे उघडकीस आले होते. या उप केंद्रात प्रसूतीगृह बांधले आहे परंतु ते वापराविना पडून होते. नुकतीच जांबरुंग येथील उप आरोग्य केंद्राची रंगरंगोटी करण्यात आली आहे. येत्या काळात तालुक्याची आरोग्य यंत्रणा चांगली व्हावी यासाठी उच्चस्तरावर पाठ पुरावा करणे गरजेचे आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आयपीपीबीने लॉन्च केली व्हॉट्सअ‍ॅप बँकिंग सर्व्हिस




सध्या एअरटेल कंपनीचे ५जी नेटवर्क देशातील सर्वात जास्त शहरांमध्ये पसरलेले आहे. तसेच IPPB बँक देखील भारतीय सरकारद्वारे चालवण्यात येणारी बँकिंग सेवा आहे. याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ सप्टेंबर २०१८ रोजी झाली. एअरटेल आणि India Post Payments Bank म्हणजेच IPBने आपल्या ग्राहकांसाठी Whats-App सेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे या ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर बँकिंग सेवेचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे.

व्हाट्सअ‍ॅप मेसेजिंग सोल्युशन Airtel IQद्वारे ग्राहकांपर्यत पोचवले जाणार आहे. यामध्ये एक क्लाउड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म सर्व्हिस आहे जी ब्रँड्सना त्यांच्या ग्राहकांशी व्हॉइस, एसएमएस आणि व्हाट्सअ‍ॅपवर संवाद साधण्याची परवानगी देते. एअरटेलने दावा केला आहे की व्हाट्सअ‍ॅपसाठी बिझनेस सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून काम करणारी ही जगातील पहिली टेलिकॉम कंपनी आहे.

एअरटेल IPPB ग्राहकांना व्हॉटसअ‍ॅपवर बँकेला कनेक्ट होण्यासाठी आणि बँकिंग सर्व्हिसचा फायदा घेण्यासाठी सक्षमी करणार आहे. या सेवांमध्ये अन्य गोष्टींसाह डोरस्टेप सर्व्हिस रिक्वेस्ट अणि जवळील पोस्ट ऑफिसचा पत्ता द्यावा लागणार आहे. एअरटेल IPPB एअरटेल IQ व्हॉटसअ‍ॅप सोल्यूशनदेखील मल्टी लँग्वेज सपोर्ट तयार करण्यासाठी काम करत आहे. यामध्ये ग्राहकांना अधिक सुविधा मिळणार आहेत. म्हणजेच, देशातील ग्रामीण भागात राहणारे लोक देखील त्यांच्या पसंतीच्या भाषेत बँकिंग सेवा वापरू शकतील. एअरटेलच्या मते, कंपनी बँकेच्या ग्राहकांना २५० दशलक्ष मासिक मेसेज प्रदान करण्यासाठी IPPB सोबत काम करत आहे.

एअरटेल IQ चे बिझनेस हेड अभिषेक बिस्वाल यांच्या मते साधायचे एसएमएस आणि व्हॉइस कम्युनिकेशनमध्ये व्हॉटसअ‍ॅप मेसेजिंगसह इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या ग्राहकांना ऑफर केले जाते. IPPB आणि एअरटेल IQ व्हॉटसअ‍ॅप सोल्यूशनमध्ये थेट एक लाइव्ह ग्राहक सपोर्ट एजंट देखील असू शकतो. यामध्ये ग्राहकांना २४ तास अणि साथी दिवस बँकिंगशी संबंधित कोणतीही माहिती मिळू शकते.

# बॉलीवूड अभिनेत्री ते राजकारणी जयाप्रदा



**निमित्त**


बॉलीवूड अभिनेत्री ते राजकारणी जया प्रदा याचा ३ एप्रिल रोजी वाढदिवस आहे. जयाप्रदा यांचा जन्म ३ एप्रिल १९६२ रोजी आंध्र प्रदेशमध्ये झाला. जयाप्रदा यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीत अनेक उत्कृष्ट चित्रपट केले आहेत. बॉलीवूडमध्येच नव्हे तर राजकारणातही त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. तेलगु चित्रपट त्यांनी सुरूवातीला काम केलं. तिथून जया प्रदा यांनी अभिनेत्री म्हणून करिअरला सुरुवात केली. त्यांनी अनेक विविध भाषांमध्ये अनेक चित्रपटात काम केले आहे. आजही त्याचे चाहते चित्रपट आवर्जून पाहत असतात.

अभिनेत्री जयाप्रदा यांचे खरे नाव ललिता राणी आहे. चित्रपटांत आल्यानंतर त्यांनी जयाप्रदा हे नाव धारण केले. जयाप्रदा यांचे वडील कृष्णा राव हे तेलगू चित्रपटांचे फायनान्सर होते. जयाप्रदा यांनी तेलगू चित्रपटातून आपल्या फिल्मी करिअरची सुरुवात केली. ‘भूमिकोसम’ हा त्यांचा पहिला चित्रपट होता. या चित्रपटासाठी जयाप्रदा यांना केवळ १० रूपये मानधन मिळाले होते.

सुरुवातीपासूनच जयाप्रदा यांचे आयुष्य रहस्यांनी भरलेले राहिले. १९८६ मध्ये जयाप्रदा यांचे फिल्मी करिअर अत्त्युच्च शिखरावर असताना त्यांनी अचानक लग्नाचा निर्णय घेतला. तेही तीन मुलांचा बाप असलेल्या निर्माता श्रीकांत नाहटा यांच्याशी. ८० च्या दशकात जयाप्रदा आघाडीच्या अभिनेत्री होत्या. पण याचदरम्यान त्यांच्या घरी इनकम टॅक्सची रेड पडली. हा त्यांच्या आयुष्यातील सगळ्यांत वाईट काळ होता. रेड पडल्यानंतर जयाप्रदा यांच्या करिअरचा ग्राफ अचानक खाली आला. याकाळात श्रीकांत नाहटा यांनी जयाप्रदांना साथ दिली. यादरम्यान त्यांच्यात मैत्री झाली आणि पुढे प्रेम. पण श्रीकांत नाहटा आधीच विवाहित होते. पण जयाप्रदा नाहटांच्या प्रेमात जणू वेड्या होत्या. पहिल्या पत्नीला घटस्फोट न देता अखेर नाहटांनी जयाप्रदांशी लग्न केले. ही बातमी सगळ्यांसाठी धक्का होती. विशेष म्हणजे, जयाप्रदांसोबत लग्न केल्यानंतरही श्रीकांत नाहटा यांना पहिल्या पत्नीपासून मुल झाले. एकंदर काय तर लग्न करूनही जयाप्रदा या कायम एकट्या राहिल्या.

लग्नानंतरही जयाप्रदा चित्रपटांत काम करू लागल्या. पण हळूहळू त्यांना चित्रपट मिळणे बंद झाले. पुढे १९९४ मध्ये जयाप्रदा यांनी तेलगू देसम पार्टीत प्रवेश केला. पुढे समाजवादी पक्षात प्रवेश केला. २००४ व्या लोकसभा निवडणुकीत जयाप्रदा रामपूरमधून निवडून आल्या आणि लोकसभेत पोहोचल्या. पण २०१० मध्ये कथितरित्या पक्षविरोधी कारवायांमुळे पक्षाने त्यांना बडतर्फ केले. त्यामुळे मार्च २०१४ मध्ये जयाप्रदा यांनी राष्ट्रीय लोकदलाचा झेंडा हाती घेतला आणि सरतेशेवटी भाजपात सामील झाल्या.

**क्लिक...क्लिक...!**




**म्हसळा : तालुक्यातील मेंदडी पाझर तलावातील पाणीसाठा कमी झाल्याने पाण्यातील जलपर्णी वनस्पती आणि चिखलामुळे पाण्याला वास आणि रंग येत असल्याचे निदर्शनास येत आहे. या तलावातील गाळ काढून पाणी शुद्धीकरण करावे आणि ग्रामस्थांची पाण्याची गैरसोय दूर करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.** (छाया : संजय खांबेटे)

## आरोग्य प्रहर

# कलिंगडच्या बिया फेकून देताय थांबा! जाणून घ्या त्याचे फायदे

उन्हाळ्यात अनेक फळे बाजारात उपलब्ध होतात. त्या फळांचा आहारात समावेश करुन तुम्हाला या ऋतूमध्ये स्वत:ला निरोगी ठेवता येते. उन्हाळ्यात आंबा, चिकू फळांबरोबर कलिंगड फळही मोठ्याप्रमाणात उपलब्ध होते. अनेक गुणधर्मांनी परिपूर्ण असलेले कलिंगड उन्हाळ्यात शरीरास पाण्याचा पुरवठा तर करतेच शिवाय आपल्याला अनेक आरोग्यविषयक समस्यांपासूनही दूर ठेवते. मानसिक आरोग्यासाठीही कलिंगड खूप फायदेशीर मानले जाते. पण तुम्हाला माहित आहे का की, केवळ कलिंगडचं नाही तर त्याच्या बिया देखील आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. त्यामुळे कलिंगडातील बिया खाऊन फेकण्यापूर्वी त्याचे आश्चर्यकारक फायदे जाणून घ्या.



**प्रजनन क्षमतेसंबंधित समस्यांवर प्रभावी** : कलिंगडातील बिया पुरुषांसाठी एका वरदानापेक्षा कमी नाहीत. याच्या वापराने प्रजनन क्षमतेसंबंधित समस्यांपासून खूप आराम मिळतो. कलिंगडातील बिया खाल्ल्याने शुक्राणूंची संख्या तर वाढतेच पण प्रजनन क्षमताही सुधारते. याशिवाय झिंक शुक्राणूंची गुणवत्ताही वाढण्यास मदत होते.

**हृदय निरोगी राहते** : कलिंगडाच्या बिया हृदयासाठीही खूप फायदेशीर असतात. यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत होते.

**पचन संस्था सुधारते :**जर तुम्ही कलिंगडाच्या बियांचे सेवन केले तर तुमच्या पचनसंस्थेलाही त्याचा खूप फायदा होतो. जर तुम्हाला पचनाच्या समस्येने त्रस्त असाल तर कलिंगडाच्या बियांचे सेवन करणे तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल.

**वजन कमी करण्यास प्रभावी** : जर तुम्हाला तुमचे वजन सहज कमी करायचे असेल तर त्यासाठीही कलिंगडाच्या बिया उपयोगी पडतात. कारण या बियांमध्ये कॅलरीजचे प्रमाण कमी असते, जे वजन कमी करण्यासाठी खूप उपयुक्त आहे.

**हाडे मजबूत होतात** : हाडांच्या मजबूतीसाठीही कलिंगडाच्या बिया खूप फायदेशीर असतात. यामध्ये असलेले ओमेगा ३, फॅटी ॲसिड, प्रथिने, झिंक, फोलेट, पोटॅशियम, कॉपर हे नॅच्युरल मल्टीव्हिटामिन्ससारखे काम करतात ज्यामुळे हाडे मजबूत होतात.

**त्वचेचे आरोग्य सुधारते** : कलिंगडाच्या बिया केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठीही खूप फायदेशीर असतात. या बिया बारीक करुन चेहऱ्यावर लावल्यास त्वचा चमकदार होते शिवाय ब्लॅकहेड्सही दूर होतात. तसेच चेहऱ्यावर एक ग्लो येतो.

## टँकरचालकाचा बेजबाबदारपणा इतरांसाठी त्रासदायक!

# मुंबई-पुणे महामार्गावर तेलगळतीमुळे अपघात

### चालकांसह प्रवाशांकडून उपाययोजनांची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावरून तेल अथवा केमिकल घेऊन जाणाऱ्या टँकरचालकांच्या बेजबाबदारपणामुळे अपघात होत आहेत. रविवारी (दि. २) अशाच एका टँकरमधून तेलगळती झाल्याने दुचाकीस्वार घसरून अपघात झाला. या वेळी परिसरातील ग्रामस्थांनी तेलगळती झालेल्या ठिकाणी माती टाकून तातत्पुरती उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला, मात्र याबाबत महामार्ग वाहतूक पोलीस त्वरीत उपाययोजना करून अशा बेजबाबदार टँकरचालकांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे.

तालुक्यातील वाढत्या कारखानदारीमुळे महामार्गावरून दररोज धावणाऱ्या टँकरची संख्या शेकडोंच्या घरात आहे. यामध्ये केमिकल व खाद्यतेलाची वाहतूक करणाऱ्या टँकरची संख्या अधिक आहे. अनेकदा या टँकरमध्ये प्रमाणापेक्षा जास्त तेल भरले जाते. शिवाय टँकरचे झाकण व्यवस्थित बंद न करता टँकरचालक बेदरकारपणे चालवत नेल्याने महामार्गावर तेल सांडून त्यावरून दुचाकी घसरून अपघात घडतात. बोरघाटात तेलगळती झाल्याने सर्वाधिक अपघात दुचाकीचे होत असून अनेकदा दुचाकीस्वाराच्या जीवावर बेतण्याच्या घटना घडल्या आहेत.

अपघात टाळण्यासाठी अशा टँकरवर कारवाईचा बडगा अगोदर उचलणे आवश्यक आहे. बोरघाटातील वाहतूक पोलीस त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी चालकांकडून करण्यात येत आहे.

## अलिबाग-रेवदंडादरम्यान एसटी बसच्या ३० फेऱ्या

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग-मुरुड या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या रेवदंडा-साळाव पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू केल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून एसटी सेवा बंद करण्यात आली आहे. अलिबाग-मुरुडकडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून अलिबाग-रेवदंडा अशा ३० एसटीच्या फेऱ्या सुरु करण्यात आल्या आहेत. प्रत्येक तासाला ही सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती अलिबाग आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांनी दिली.

रेवदंडा-साळाव पूल जीर्ण झाल्याने त्या पुलाची दुरूस्ती करणे गरजेचे होते. त्यासाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या पुलाची दुरूस्ती सुरू केली आहे. या पुलावरून पाच टनापेक्षा अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले. त्यानुसार प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या पुलावरून एसटी सेवा बंद करण्याच्या सूचना विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आल्या, मात्र प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून अलिबाग-रेवदंडा अशा ३० एसटीच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

## पेण शहरात स्वच्छता यात्रेतून जनजागृती





**पेण : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानांतर्गत नगरपालिका स्वच्छता विभागामार्फत पेण शहरात स्वच्छता यात्रेचे रविवारी (दि. २) आयोजन करण्यात आले होते. पेण नगरपालिका कार्यालयापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आंबिका मंदिर, कुंभार आळी, नंदिमाळ नाकामार्गे विश्वेश्वर नगरपर्यंत काढण्यात आली.

या स्वच्छता यात्रेमध्ये मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य विभागाच्या अंकिता इसाळ, शिवाजी चव्हाण, उमंग कदम, ॲड. तेजस्विनी नेने, नगरसेवक संतोष पाटील, प्रदिप पाटील, प्रमोद फाटक, शशी भगत यांच्यासह स्वच्छता विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहराच्या स्वच्छता अभियानात मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी विशेष दिले असून वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून शहरातील जनतेला त्या उपक्रमांमध्ये सामील करून घेतले आहे. स्वच्छता यात्रा झाल्यानंतर अंकिता इसाळ यांनी सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली. त्यानंतर आलेल्या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नगरपालिकेने रविवारी केलेले वृक्षारोपण उल्लेखनिय असून यामध्ये सर्व फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये आंबा, पेरू, फणस, चिकू, रांजण इत्यादींचा समावेश होता.

## रोह्यात प्राण्यांसाठी अनाथालय सुरू

**रोहा : रामप्रहर वृत्त**

रोहा तालुक्यातील कोलाड विठ्ठलवाडी येथे एका तरुणाने सात एकर जागेत मानवतेच्या दृष्टीकोनातून अनाथ व जखमी पाळीव प्राण्यांसाठी प्राणी अनाथालय सुरु केले आहे. रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेले गुरे, श्वान, मांजर व अन्य प्राणी यांच्यासमोर मृत्यू उभा असतो, त्याखेरीज त्यांच्याकडे अन्य पर्याय ही नसतो, मात्र त्यांच्या जीवनात जगण्याची उमेद हे अनाथालय जागवते.



गणेश नायक हा तरुण या माध्यमातून अनाथ व जखमी प्राण्यांना हक्काचे आश्रयस्थान मिळवून देत आहे. अशा पशु प्राण्यांना अनाथलयात नेऊन त्यांच्यावर उपचार केले जातात. बरे झाल्यावर त्यांना त्यांच्या अधिवासात सोडले जाते, तर वृद्ध प्राण्यांचे पालन पोषण याच ठिकाणी केले जाते. प्राणी मात्रावरील भूतदया प्रेरणादायी ठरतेय. गुरे, कोंबड्या, बकऱ्या, कुत्रे, मांजर, डुकर आदींसाठी हे अनाथालय महत्वपूर्ण वरदान ठरत आहे.

याबाबत गणेश नायक यांनी सांगितले की, भटके प्राणी जनावरे यांचे रस्त्यावर अपघात होतात. जखमी प्राण्यांना ते घेऊन अनाथालयात नेतो, त्यांच्यावर उपचार करून त्यांच्या अधिवासात सोडतो व वृद्ध जनावरे प्राणी यांचे संगोपन करतो. आईने हे काम सुरू केले होते, तिचे स्वप्न होते ते काम पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न आहे. १२ वर्षांत १८ हजार जनावरे वाचवले आहेत. आईच्या स्वप्नांना साकारण्याचे काम करीत आहे.

## भरती परीक्षेसाठी लाच घेणाऱ्या पोलिसाला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलात सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत नोकरीला लावतो, असे सांगून एक लाख रुपये उकळणाऱ्या एकाला रायगड पोलिसांनी अटक केली आहे. पी. बी. मोकल असे आरोपीचे नाव आहे.

१५ फेब्रुवारी रोजी आरोपी मोकल याने एका व्यक्तीला गाठून तुमच्या मुलाला रायगड पोलीस दलात नोकरीला लावतो, त्यासाठी सात लाख रुपये मोजावे लागतील असे सांगितले. त्यानंतर फिर्यादींचा पुतण्या आणि मुलगा मोकल याला भेटायला गेले. तेथे यापूर्वी मागणी केलेल्या ७ लाख रुपयांपैकी १ लाख रुपये स्वीकारले. यासंदर्भातील तक्रार आल्यानंतर पोलिसांनी त्याची शहानिशा करून रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपी मोकलला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## जिल्हा स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेचा आज शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तत्कालीन जिल्हाधिकारी आणि सध्याचे विभागीय कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यात सर्व तालुक्यांमधून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता गरुडझेप स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यात आले होते. त्यातील एक अलिबाग येथील जिल्हा स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका ही नूतन वास्तू दिमाखात उभी राहिली आहे. या नवीन वास्तूचे उद्‍घाटन पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सोमवारी (दि. ३) सकाळी ११ ते ११.३० च्या दरम्यान होणार आहे.



या कार्यक्रमासाठी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मुलांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, ऑनलाईन मार्गदर्शन तसेच स्पर्धा परीक्षेची पुस्तके विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली होती. याचेच पुढचे पाऊल म्हणून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी अभ्यास केंद्र मिळावे, या हेतूने तालुक्याच्या ठिकाणी जिल्हा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र व अभ्यासिका उभे करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यातील एक अलिबाग येथील जिल्हा स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका ही नूतन वास्तू दिमाखात उभी राहिली आहे.

## सुधागडात शॉर्टसर्किटमुळे शेतातील कडधान्य खाक

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर बुद्रुक येथे शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने शेतातील कडधान्य खाक झाल्याची घटना नुकतीच घडली आहे.

शेतकरी बाळू दुर्गे, अनंता गायकवाड, स्मिता गुप्ते आपापल्या शेतात वाल काढत असताना अचानक येथून गेलेल्या वीज वाहिन्यांमध्ये घर्षण झाले व आग लागली. त्यामुळे शेतात तयार झालेले कडधान्याने पेट घेतला. या घटनेत दुर्गे, गायकवाड आणि गुप्ते यांचे प्रचंड नुकसान झाले. घटनेबाबत कृषी अधिकारी, तलाठी, महावितरणला कळवल्यावर सिद्धेश्वर बुद्रुक येथील तलाठी यांनी घटनास्थळी पोहचून नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर कृषी सहाय्यकांनी पाहणी केली. शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## रंगोत्सव स्पर्धेत वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे यश


**खोपोली : प्रतिनिधी**

रंगोत्सव सेलिब्रेशन इंटरनॅशनल आर्ट स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवर खोपोलीच्या वसंत देशमुख मेमोरियल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली.

या स्पर्धेत अनिकेत शेकापूरकर, अंशिका चौरसिया यांना स्पेक्टॅक्युलर परफॉर्मन्स अवार्ड देण्यात आला. मानवी नेगी, प्रभात मिश्रा आणि उपासना निकम यांचा इमार्जिंग युथ आर्टिस्ट अवॉर्ड (मेडल) देऊन सन्मानित करण्यात आले, तर निखिल मंडळ आणि निहारिका विश्वास यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष उल्हास देशमुख, शाळा समितीचे अध्यक्ष विक्रांत देशमुख, प्रशासकीय अधिकारी तेजस्वी देशमुख, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सीमा नाईक, प्राथमिक व उच्च प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अश्विनी वाघुले यांनी कौतुक केले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक अजय जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.



## नवरा नवरी आणि करवली सुळके चढाई प्रस्तररोहकांसाठी सुरक्षित






### सुरक्षा वाढली

*संस्थेचे खजिनदार नुवाझीश पटेल म्हणाले की, या रि-बोल्टिंग मोहिमेत एकून २१ बोल्ट्स लावण्यात आले. या कामात मार्ग न बदलण्याची पूर्ण काळजी घेण्यात आली. व्ही२ए स्टील बोल्ट्स गंजत नाहीत तसेच ते किमान तीन हजार किलोग्रॅम वजन पेलू शकतात. भारतीय हवामानात किमान ५० वर्षं ते उत्तम काम देऊ शकतात.*

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पुणे जिल्हा व सुधागड तालुक्याच्या सीमेवर असलेले नवरा नवरी आणि करवली सुळके यांवरील चढाई प्रस्तरारोहणासाठी प्रसिद्ध आहेत, मात्र येथील अवघड व कठीण चढाईमुळे हौशी प्रस्तारारोहक येथे चढाई करण्यास कचरत असत. आता भांबर्डे नवरा नवरी आणि करवली सुळके चढाई प्रस्तरारोहकांसाठी झाली अधिक सुरक्षित झाले आहेत. नुकतेच सेफ क्लाइंबिंग इनिशिएटिव्ह या संस्थेने इथे असलेला प्रस्तरारोहणाचा धोका ओळखून री-बोल्टिंग व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. नवीन प्रस्तरारोहकांना री-बोल्टिंगचे प्रशिक्षण देणे आणि मार्ग सुरक्षित करणे हा या शिबिराचा हेतू होता.

सुधागड किल्ल्याच्या सोमोर असलेले, लोणावळा-ताम्हिणी मार्गावर भांबर्डे गावाच्या पाठीमागे एकमेकांपासून वेगळे दिसणारे तीन सुळके म्हणजेच नवरा नवरी आणि करवली सुळके. पुण्यापासून ९० किमीवर असल्यामुळे बरेच प्रस्तरारोहक काही वर्षांपासून प्रस्तरारोहणासाठी इथे येतात, पण इथे असलेले जुने रिंग बोल्ट गंजल्याने प्रस्तरारोहण धोक्याचे झाले होते. या मोहिमेमुळे ते अधिक सुरक्षित झाले आहे. येथे आता अधिक प्रस्तरारोहक प्रस्तरारोहणासाठी येतील.

या मोहिमेत सुरेंद्र शेळके, विवेक मराठे, डॉ. नरेंद्र पाटील, सुनील पिसाळ, नुवाझीश पटेल, संजय शेळके, तुषार दिघे, कृष्णा मरगळे, गीतेश बांगरे, सुधागड तालुक्यातील मॅकमोहन हुले, महेश कुमार आणि निहार सोले अशा १२ जणांच्या चमूने सहभाग घेऊन तीन दिवसांत हे तीनही सुळके रि-बोल्टिंग करून सुरक्षित केले अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र पाटील यांनी दिली.

**या मोहिमेमुळे आता हे सुळके अधिक सुरक्षित आणि चढण्यास सोपे झाले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यासह पुणे, मुंबई येथील प्रस्तरारोहक या ठिकाणी येऊन उत्तम प्रकारे चढाई करू शकतील. यामुळे पर्यटन वाढीला तसेच प्रस्तारारोहणास अधिक चालना मिळेल.**

**-मॅकमोहन हुले, प्रस्तररोहक, सुधागड**

## शेवगा पिकाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील गौळवाडी येथे शेवगा, हळद, बटाटे, पपई आदी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

राजकीय नेते आणि प्रगतशिल शेतकरी पुंडलिक तथा बंधू पाटील शेतीमधून नगदी पिके घेण्यासाठी पुढाकार घेत आहेत. त्यामुळे इतर शेतकऱ्यांनीही असे प्रयोग करून भरघोस उत्पन्न मिळावे यासाठी पुढाकार घ्यावा यासाठी मार्गदर्शन केले. त्यांनी या वेळी सांगितले की, शेवगा, पपई, हळद, बटाटे अशी पिके घेता येऊ शकतात आणि ही पिके कमी वेळेत उत्पादन देत असतात. शेवगा हे पीक सहा महिन्यांत उत्पादन देणारे आहे, तसेच शेवग्याच्या एका झाडापासून ३५ ते ४० किलो शेंगा विक्रीसाठी उपलब्ध होऊ शकतात. शेवग्याचे एक झाड हे आठ ते दहा वर्षे उत्पादन देऊ शकते, तर पपईचे झाडदेखील शेतकऱ्यांना चांगले उतपादन देऊ शकते, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी सूर्यकांत भिसे, विठ्ठल भोईर, अशोक पाटील आदींसह अनेक प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

# गद्दारी करणाऱ्यांचा टांगा पलटी करू

## प्रवक्ते नरेश म्हस्के यांचा ठाकरे गटाला इशारा




**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

सन २००९मध्ये लोकसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे विजय चौगुले उमेदवार असताना त्यांना पाडण्यासाठी ठाण्यातील चरई येथील कार्यालयातून षडयंत्र रचण्यात आले असा गौफ्य स्फोट शिंदे गटाच्या शिवसेनेचे प्रवक्ते नरेश मस्के यांनी केला. गद्दारी करणाऱ्या खासदाराला येत्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली असून गद्दारी करणाऱ्या खासदाराचा टांगा पलटी करू, असा इशारा म्हस्के यांनी ठाकरे गट आणि ठाणे लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार राजन विचारे यांना दिला.

सानपाडा येथे बाळासाहेबांची शिवसेना यांच्या वतीने पक्षाचे प्रवक्ते व ठाणे लोकसभा संपर्क प्रमुख नरेश म्हस्के यांचा जाहीर सत्कार आणि पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी म्हस्के यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

या वेळी व्यासपीठावर उपनेते विजय नाहटा, जिल्हा प्रमुख विजय चौगुले, युवा नेते ममित चौगुले, संपर्क प्रमुख किशोर पाटकर, माजी उपमहापौर अशोक गावडे, उपजिल्हाप्रमुख जगदीश गवते, ॲड. रेवेंद्र पाटील, माजी नगरसेवक राजू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

१११ प्रभागातील पदाधिकाऱ्यांनी घेतलेली पदे केवळ स्वतःसाठी न मिरवता जनतेच्या सेवेसाठी त्याचा वापर करा, जनतेपर्यंत पोहचून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन मजबूत, असे आवाहन जिल्हा प्रमुख चौगुले यांनी कार्यकर्त्यांना केले. आगामी कालावधीत मुख्यमंत्री शिंदे यांचा महा मेळावा, युवा व महिला सेनेचा मेळावा घेण्यात येणार असल्याची माहितीही चौगुले यांनी दिली.

या वेळी मार्गदर्शन करताना उपनेते नाहटा यांनी मुख्यमंत्री आणि सरकारच्या नावाने बोंबल्या शिवाय विरोधकांना चैन पडत नसल्याची टीका केली. नवी मुंबईतील सर्व सामान्य नागरिकांची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन नरेश म्हस्के यांना यावेळी नाहटा यांनी केले.

### ‘मातोश्री’वरून कामात नेहमी अडथळा आणण्याचा प्रयत्न

*कळवा मुंब्राचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी स्व. बाळासाहेब आणि उद्धव ठाकरेंच्या प्रतिमेला काळे लावले आहे. मातोश्री वरून युवराज असणारे आदित्य ठाकरे यांचा आव्हाडला मदत करायची असा फोन आला. एकनाथ शिंदे यांच्या बाजूने बोलल्यास मातोश्रीवर नेहमी अडवणूक होऊ लागली. कोरोनाच्या काळात मी महापौर असताना ही ‘मातोश्री’वरून कामात नेहमी अडथळा आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे आपण हे शिवसेना सोडण्याचा निर्णय घेतल्याचे नरेश म्हस्के यांनी या वेळी सांगितले.*

### ...म्हणून शिंदेंनी ठाकरेंची साथ सोडली!

*नगर विकास मंत्री म्हणून त्याचप्रमाणे कोरोनाच्या कालावधीत एकनाथ शिंदे यांनी जीव ओतून काम केले. शिंदे यांची वाढती लोकप्रियता उद्धव ठाकरेंना खुपली. त्यानंतर मातोश्रीवर एकनाथ शिंदे यांची घुसमट सुरू झाली. बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना काँग्रेस-राष्ट्रवादीच्या दावणीला बांधली गेल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडण्याचा निर्णय घेतला, असेही म्हस्के यांनी सांगितली.*

# नवी मुंबईत स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा उत्साहात

### आमदार मंदाताई म्हात्रे यांची उपस्थिती



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्याविषयी आजच्या पिढीला माहिती होण्यासाठी भाजप नवी मुंबई आणि शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने बेलापूर पामबीच मार्ग ते वाशी शिवाजी चौकपर्यंत वीर सावरकर गौरव यात्रा मोठ्या जल्लोषात काढण्यात आली.

या गौरव यात्रेत बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे, शिवसेना उपनेते विजय नाहटा, शिवसेना नवी मुंबई संपर्क प्रमुख किशोर पाटकर, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, ओबीसी जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष पांडुरंग आमले, माजी नगरसेवक अशोक गुरखे, युवा महिला मोर्चा अध्यक्षा सुहासिनी नायडू कमलेश वर्मा, माजी विरोधी पक्षनेत्या सरोज पाटील, रोहिदास पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष पांडुरंग आमले आदी भाजप शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून त्यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. तसेच त्यांची खासदारकी रद्द केली गेली. नंतर त्यांनी ‘मी माफी मागणार नाही, मी गांधी आहे, सावरकर नाही’, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यावरून राज्यात पुन्हा सावरकर समर्थकांत असंतोष निर्माण झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यात ‘स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर गौरव यात्रेची’ घोषणा केली. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत ही गौरव यात्रा काढण्यात आली. या गौरव यात्रेत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरील विविध पैलूंसह माहिती प्रदर्शित करण्यात आली. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे अभूतपूर्व योगदान समाजातील सर्व घटकांतील वर्गापर्यंत पोहचविण्याचे कार्य या निमित्ताने करण्यात आल्याचे शिवसेना उपनेते विजय नाहटा व आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले.

ही गौरव यात्रा बेलापूर येथील श्री गोवर्धनी माता मंदिराच्या प्रवेशद्वारापासून निघून ती पामबीच मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक वाशी येथे यात्रेची सांगता करण्यात आली.



**उरण : पीरकोन गावची मोठी विहीर अर्थात मोठी बाव आणि परिसराची साफसफाई फणसवाडी मैत्री कट्टा परिवाराकडून श्रमदानातून करण्यात आली. सूर्यकांत गावंड, विलास गावंड, मंगेश म्हात्रे, राजा जोशी, प्रमोद जोशीं, प्रवीणजोशी, अभि पाटील, बाबू पाटील, विलास पाटील, केतन गावंड, सूरज घरत, प्रशांत गावंड, यतीश गावंड, प्रतीक घरत, आणि विनायक गावंड आदी मैत्री कट्टा फणसवाडीचे पदाधिकारी, सदस्य यांनी ही मोहीम यशस्वी केली.**

# गोमांस वाहतूक करणारा कंटेनर रसायनी पोलिसांनी पकडला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गोमांसाची वाहतूक करणारा कंटेनर रसायनी पोलिसांनी भाताण भोगद्याच्या जवळ पकडला. गेल्या आठवड्याभरात गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना पकडण्याची ही तिसरी वेळ आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर भाताण बोगद्याजवळ एक कंटेनर रसायनी पोलिसांना संशयास्पद आढळल्याने त्याची पाहणी केली असता त्या कंटेनरमध्ये १० लाख आठ हजार रुपये किमतीचे गोमांस आढळले.




या प्रकरणी कंटेनर (क्र. एचआर ३८ एस ७२८०) चालक पेशकुमार ध्रुवनारायण सिंग (रा. बिहार) यास रसायनी पोलिसांनी कोणतीही कागदपत्र जवळ न बाळगता अवैधरित्या गोमांसाची वाहतूक केल्याप्रकरणी अटक केली आहे.

त्याच्यावर गुन्हा रजि नं. ७४/२०२३ महाराष्ट्र प्राणी रक्षण (अधिनियम) सन १९९५ चे कलम ५(क), ५(ड), ९(अ), ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा कंटेनर तेलंगणा येथील असून कंटेनरचा मालक अंकुश याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी कंटेनर आणि गोमांस असा एकुण ४५ लाख आठ हजार रूपयांचा मुद्देमाल रसायनी पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रमोद पाटील हे तपास करीत आहेत.

# वीर जवानांसाठीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रतिसाद



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशासाठी हुतात्मा झालेल्या वीर जवानांच्या कुटूबियांच्या मदतीसाठी कार्यरत असणाऱ्या वीर जवान फाउंडेशन संस्थेच्या वतीने विष्णुदास भावे नाट्यगृह येथे एक शाम वीर जवानोंके नाम हा देशभक्ती पर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

प्रारंभी, शिवसेना उपनेते फाउंडेशन सस्थापक विजय नाहटा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच कार्यक्रमास उपस्थित प्रमुख मान्यवरांचे विजय नाहटा यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश काकडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला विशेष उपस्थितीती पार्श्वगायिका आणि प्रसिद्ध सिनेपार्श्वगायक उदित नारायण यांच्या धर्मपत्नी दीपा उदित नारायण यांची लाभली होती. कार्यक्रमाला शासकीय सेवेतील विविध उच्चपदस्थ लाभले होते.

या वेळी संस्थेचे संस्थापक विजय नाहटा यांनी संस्थेचे अध्यक्ष सुरेश काकडे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करून जवानांसाठी करत असलेल्या कार्याची प्रशंसा केली. भविष्यात वीरजवान कुटुंबीयांसाठी तसेच निवृत्त जवानांसाठी सरकार कडून भरीव मदत मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करणार असून नवी मुंबईत वीरजवान भवन निर्मितीसाठी भूखंड मिळावा म्हणून मुख्यमंत्री. एकनाथ शिंदे यांना भेटणार असल्याचे विजय नाहटा यांनी सांगितले.

या वेळी विजय नाहटा व संस्थेचे अध्यक्ष सुरेश काकडे यांच्या हस्ते संस्थेत काही पदाधिकाऱ्यांना नियुक्त करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली.

# कोळखे चर्चमध्ये पाम संडे उत्साहात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिलीवर्स ईस्टर्न चर्च कोळखे येथे पाम संडे किंवा झावळ्याचा रविवार हा सण (दि. २) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ताडाच्या झाडाच्या पानांनी चर्चची केलेली सजावट हि मंत्रमुग्ध करणारी होती.

ह्या पवित्र सणाचा विधी हिज ग्रेस मार्टिन मोर एप्रेम इपिस्कोपा आणि रेवरेंट फादर संकेत मसिह यांनी पार पाडला तसेच चर्चच्या परिसरामध्ये गीत-भजन गात पदयात्रा पण करण्यात आली होती. पाम संडे किंवा झावळ्याचा रविवार हा वधस्तंभावरील मृत्यूच्या सात दिवसाआधी म्हणजे रविवारच्या दिवसी येशू ख्रिस्ताचा येरुशलेम शहरामध्ये गाढवावर बसून केलेला प्रवेश होता आणि त्या दिवशी सर्व लोकसुदाय आणि त्याच्या मागे चालणारे मोठ्याने जयघोष करत होते की, दाविदाच्या पुत्राला होसान्ना. प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित आहे.

उर्ध्वलोकी होसान्ना! अशी घोषणा करून प्रभु येशूचे स्वागत केले होते. ह्याच घटनेच्या स्मरणार्थ पाम संडे हा सण ख्रिस्ती बांधव लोक मोठ्या उत्साहात साजरे करतात.

# देशासाठी सावरकरांनी आयुष्य पणाला लावले

## आमदार गणेश नाईक यांचे गौरव यात्रेत प्रतिपादन



**नवी मुंबई : बातमीदार**

देशासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सर्वोच्च पणाला लावले, असे प्रतिपादन आमदार गणेश नाईक यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेमध्ये काढले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा वारंवार अपमान करणाऱ्या काँग्रेसचा निषेध करण्यासाठी आणि सावरकरांचे कार्य पुन्हा एकदा जनतेपर्यंत आणि युवा पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी नवी मुंबईमध्ये रविवारी (दि. २) स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. या गौरव यात्रेमध्ये हजारो सावरकर प्रेमी नागरिकांनी रणरणत्या उन्हातही सहभाग घेतला.

आमदार गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती या गौरव यात्रेला लाभली. त्यांच्यासह माजी खासदार डॉ. संजीव नाईक, ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार संदीप नाईक, नवी मुंबई महापालिकेचे माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृहनेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, युवा नेते संकल्प नाईक, सावरकर विचार मंच नवी मुंबईचे संतोष कानडे आदी मान्यवरांनी या गौरव यात्रेत भाग घेतला.

वाशी येथील हॉटेल ब्लू डायमंड पासून स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेला सावरकरांच्या देशभक्तीपर गाण्यांनी शुभारंभ झाला. यात्रेत सहभागी सावरकर प्रेमींनी भगव्या टोप्या परिधान केल्या होत्या. भगव्या पताका आणि भगव्या झेंड्यांनी वातावरण भगवेमय झाले होते. ’मी सावरकर’ आणि ’आम्ही सारे सावरकर’ घोषवाक्य असलेले फलक सावरकर प्रेमींनी हातात धरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जयघोष, वंदे मातरम, भारत माता की जय, अशा घोषणा देत ही गौरव यात्रा वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये पोहोचली. या ठिकाणी झालेल्या सांगता सभेमध्ये लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी आपले विचार मांडले. देशासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सर्वोच्च पणाला लावले. जाज्वल्य राष्ट्रभक्ती असतानाही काही प्रवृत्ती त्यांच्याविषयी अपमान जनक वक्तव्य करीत आहेत. हे आरोप करणाऱ्यांचे दुर्भाग्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशासाठी दिलेले योगदान कोणीही विसरू शकणार नाही असे सांगून लोकनेते नाईक यांनी आजच्या युवा पिढीला स्वातंत्र्यवीर सावरकरांची देशभक्ती आणि मातृभक्ती याविषयीचे प्रेरणादायी विचार आणि त्यांचे कार्य समजावे यासाठी आजच्या गौरव यात्रेचे आयोजन केल्याचे सांगितले.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान देश सहन करणार नाही असा इशारा देण्यासाठी शिवसेना, भाजपा आणि सावरकर प्रेमींनी आजची गौरव यात्रा आयोजित केली आहे. स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी आणि स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनीदेखील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याचा सन्मान केला असताना काँग्रेसचे नेते राहुल गांधी मात्र वारंवार सावरकरांचा अवमान करीत आहेत. हा अपमान आता खपवून घेतला जाणार नाही.**

**-डॉ. संजीव नाईक**, माजी खासदार

### ‘स्वातंत्र्यवीरांचे विचार प्रेरणादायी’

*स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आणि कार्य आजच्या युवा पिढीसाठी दिशा देणारे आणि प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार संदीप नाईक यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सावरकरांचा सिंहाचा वाटा तर होताच शिवाय समाजसुधारक म्हणूनदेखील त्यांचे कार्य मोठे आहे. अस्पृश्यता निवारण, स्वदेशीचा पुरस्कार, सदृढ समाजासाठी युवकांमध्ये व्यायाम प्रसार आणि प्रचार या विषयात त्यांनी क्रांतिकारी कार्य केले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल गैरसमज पसरविण्याचे काम काही प्रवृत्ती करीत आहेत. त्याचे खंडन केले पाहिजे.*

# एपीएमसी बाजारात चोरीच्या घटनांनी व्यापारी मेटाकुटीस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसी बाजार आवारात अनेक घटना घडत असतात. लूटमार, चोरी, अवैध धंदे, गांजा विक्रीच्या घटना नित्याने ऐकीवात येत असतात. मात्र आता गेल्या काही महिन्यांपासून बाजार आवारात व्यापाऱ्यांच्या गाळ्यात, बाहेर चोरीच्या घटना वाढल्या असून बाजारात पार्किंगमध्ये उभ्या केल्या दुचाकी ही चोरी होत आहेत. तसेच याठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा तोकडी असून सुरक्षा रक्षक ही अपुरे पडत आहेत. त्यामुळे वाढलेल्या चोरीच्या घटनांनी व्यापारी मेटाकुटीला आले आहेत.



मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची आशिया खंडातील सर्वात मोठे कृषी बाजारपेठ म्हणून ख्याती आहे, मात्र ही बाजार समिती सीसीटीव्ही विना सुरक्षितेत मागे राहिली आहे. प्रत्येक मार्केटमध्ये सुरक्षा रक्षक तेसच व्यापारी असोसीएच्याशनच्या अंतर्गत काही ठिकाणी सीसीटीव्ही आहेत, मात्र या १७० एकरवर वसलेल्या एपीएमसी मार्केटला जास्त सुरक्षेची गरज आहे. फळ, धान्य, भाजीपाला, मसाला, कांदा-बटाटा बाजार असे पाच बाजार एकाच आवारात सुरू आहेत. या बाजारात दरोरोज हजारो गाड्या वेगवेगळ्या ठिकाणांहून येतात. त्यात वेगवेगळ्या शेतकऱ्यांचा वेगवेगळ्या प्रतीचा माल असतो. या बाजाराच्या आवारात ३७०० गोदामे, १५०० व्यावसायिक गाळे आहेत, मात्र याकरिता केवळ २७० सुरक्षा रक्षक असून तेही केवळ प्रवेशद्वारावर पहाऱ्याला असतात.

पाचही बाजार आवारात सीसीटीव्ही यंत्रणा ही तोकडीच आहेच. सुरक्षारक्षक ही प्रवेशद्वार असून बाजारातील सुरक्षा मात्र बेभरोसे आहे. गेल्या काही महिन्यांपासून बाजारातील शेतमालाच्या गोणीच्या गोणी हातोहात चोरी होत आहेत. तर दिवसाढवळ्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकी चोरीला जात आहेत. शिवाय व्यापाऱ्यांच्या तिजोरीतील रोकड लंपास केली जात आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या चोरीच्या घटनांनी व्यापारी आणि बाजार घटक हवालदिल झाले असून एपीएमसीने बाजारातील सुरक्षा अधिक करडी करावी, अशी मागणी होत आहे.

**एपीएमसी बाजारात चोरीच्या घटना वाढत आहेत. शेतमालाची चोरी होतेच शिवाय वाहने चोरी होत आहेत. माझ्या गाळ्यातुन चार लाखांची चोरी झाली होती. मात्र याची तक्रार करण्यासाठी एपीएमसीचा साधा टोल फ्री संपर्क ही उपलब्ध नाही. त्यामुळे चोरीची तक्रार करायची कोणाकडे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

**-मनोहर तोतलानी,**
व्यापारी, कांदा-बटाटा बाजार

# मुरुडमध्ये कोट्यवधींच्या विकासकामांचे लोकार्पण

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते शुभारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्यासाठी आमदार म्हणून मी कटिबद्ध आहे. पर्यटनक्षेत्रात स्वच्छ व सुंदर मुरूड हे नाव प्राधान्याने घेतले जाईल, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व उद्घाटन सोहळ्यावेळी केले.

वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून व विशेष रस्ता अनुदान निधीतून चार कोटी ७३ लाख खर्चाच्या विकासकामांचा शुभारंभ आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते रविवारी (दि. २) करण्यात आला. या वेळी नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, संदिप पाटील, सागर चौलकर, पांडुरंग आरेकर, गिरीश साळी, महेश भगत, प्रमोद तांबडकर, महेश पाटील, मेघाली पाटील, पांडुरंग आरेकर, मनोज पुलेकर, अविनाश दांडेकर, प्रमोद भायदे, अशोक धुमाळ, विश्वास चव्हाण आदींसह कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.



या वेळी दत्तमंदिर रस्ता, नगर परिषद अग्निशमन केंद्र इमारत, लक्ष्मीखार अंतर्गत रस्ता, भोगेश्वर पाखंडी येथील रस्ता, माहिती केंद्र येथील स्लॅब ड्रेन व भोगेश्वर पाखाडी जंजिरकर गल्ली येथील संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्चर माऊली उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांच्या हस्ते कुंभारवाडा येथील संत गोरा कुंभार उद्यानाचे तर फलकाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.



यानंतर शहर शिवसेना अध्यक्ष संदीप पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, मुरूड शहराच्या सर्वांगिण विकासासाठी नगरविकास विभागाकडून ४० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी लवकरच प्राप्त करून देण्यात येणार आहे. या वेळी सी. एम. ठाकूर, सुनील दिवेकर, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, संदीप पाटील, गिरीश साळी, बाबू सुर्वे, महेश भगत आदी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, समुद्रकिनारा सुशोभिकरणासाठी राज्य शासनाकडून ११ कोटी ४३ लाख रुपये मंजूर झाले असून याबाबतची निविदा प्रक्रियासुद्धा पूर्ण झाली आहे. टपरीधारकांना छोटे गाळे याच योजनेतून देण्याचा मानस आहे. साळाव -रेवदंडा पुलाच्या दुरूस्तीसाठी तातडीचा निधी मंजूर केला असून यासाठी आठ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. साळाव ते आगरदांडा रस्ता राष्ट्रीय महामार्गात घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नांदगाव येथील बायपास रस्ताही करण्यात येणार आहे. मुरूड तालुक्याचा सर्व बॅकलॉक भरून काढून सर्व विकासाची कामे पूर्ण करणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. वांद्रे व सांबरकुंड धरणासाठी निधी प्राप्त व्हावा यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन मागणी केली आहे.


### मुरूडला होणार धर्मवीर आनंद दिघे यांचे स्मारक

**धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचे स्मारक मुरूडला होण्यासाठीचा प्रस्ताव बनवण्यात आला असून मुखमंत्री एकनाथ शिंदे त्यासाठी निधी उपलब्ध करून देणार आहेत, असेही आमदार महेंद्र दळवी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**

# नेरळ-कळंब रस्त्याचे कॉंक्रीटीकरण सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळ-कळंब भागातील अत्यंत खराब असलेल्या भागातील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यास सुरुवात झाली आहे.



माथेरान-नेरळ-कळंब या राज्यमार्ग खोपोली-कर्जत-मुरबाड-शहापूर या राष्ट्रीय महामार्गाला जाऊन मिळत असल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी महत्त्वाचा समजला जातो. या रस्त्यावर कोल्हारे ग्रामपंचायतीमधील साई मंदिरापासून धामोतेपर्यंत असलेल्या रस्त्याची दूरवस्था झाल्याने पावसाळयात रस्त्यावर पाणी साचत असते. वाहनचालकांना पावसाळ्यात या रस्त्यावरून वाहने चालविणे जीकिरीचे झाले होते. त्यामुळे स्थानिकांनी या भागातील रस्त्याचे आरसीसी कॉंक्रीटकरण करावे, अशी मागणी केली जात होती. त्यानंतर धामोते धनेश्वरी मंदिर ते विद्याभवन शाळा या भागातील रस्त्याच्या कॉंक्रीटीकरण कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी मंजूर केला आहे.

> **रस्त्याच्या खाली असलेली जमीन ही पाणी असलेली जमीन असल्यामुळे रस्ता हा पावसाळ्यात कायम खराब होत असतो. रस्त्यावर खड्डे पडण्याचे प्रकार होतात. त्यामुळे या भागातील रस्त्यावर डांबरीकरणाऐवजी कॉंक्रिटीकरण करण्यात येत आहे.**
>
> **-संजीव वानखेडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# खारगाव ग्रामस्थांना एमआयडीसीकडून अखेर नुकसानभरपाई मिळणार

## १५८ शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याने समाधान

**रोहे : प्रतिनिधी**

एमआयडीसीच्या दूषित पाण्यामुळे शेत जमिनीचे नुकसानी होणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून मदत मिळते. या नुकसानीचे खारगाव ग्रामस्थ प्रतीक्षेत असताना आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने येत्या ५ एप्रिल रोजी १५८ लाभार्थींना नुकसानभरपाई मिळणार असल्याची माहिती शिवसेना चणेरा विभाग प्रमुख विकास पाटील यांनी दिली आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यामुळे कुंडलिका नदीकिनारी असलेल्या शेतजमिनींना मोठा फटका बसला आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून ठराविक रक्कम मिळत असते. या नुकसानाची भरपाई मिळण्यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना चणेरा विभाग प्रमुख विकास पाटील यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्याकडे मागणी केली. आमदार महेंद्र दळवी यांनी उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे पाठपुरावा केला.

त्याला यश आले असून १५८ शेतकऱ्यांना ६५,३१,४३२ रुपये नुकसान भरपाई मिळणार असून याचे वाटप आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते व शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत ५ एप्रिल रोजी होणार आहे.

# कर्जत नगर परिषदेतर्फे दिव्यांगांना निधीचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेने नगरपरिषद क्षेत्रातील १६२ दिव्यांग लाभार्थींना १२ लाख ९६ हजार रुपयांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

शासन निर्णयानुसार दिव्यांग लाभार्थींना पाच टक्के निधी राखीव ठेवणे व निधी खर्च करण्याबाबत शासनाच्या सूचनेनुसार कर्जत नगर परिषदेने नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात २०२२-२३करिता २० लाखांची तरतूद करण्यात आली होती. नगर परिषदेच्या वतीने नगर परिषद क्षेत्रातील दिव्यांग लाभार्थींना आवाहन करण्यात आले होते. दिव्यांगांना लाभाचे वाटप करण्यासाठी नगर परिषदेच्या तळमजल्यावरील मोकळ्या जागेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या हस्ते लाभार्थींना निधी वाटप पत्र देण्यात आले. या वेळी कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र गोसावी, सुदाम म्हसे, डी. के. गायकवाड आदी उपस्थित होते.



१६२ दिव्यांग लाभार्थींना थेट लाभार्थीच्या बँक खात्यात प्रत्येकी आठ हजार रुपयांप्रमाणे रक्कम जमा करण्यात आली. अशा एकूण १२ लाख ९६ हजार रुपयांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

## निवडक

### दिव येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



**पेण** : तालुक्यातील दिव येथील नागेश्वर भाऊबंद मंडळ दिव यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्सहाने साजरा करण्यात आला. या उत्सवामध्ये भजन, आरती तसेच नऊ दिवस हभप. प्राची मंदार व्यास (डोंबिवली) यांचे कीर्तन झाले. त्यांना भाल विठ्ठलवाडी येथील जितेंद्र मात्रे यांची तबल्याची साथ, किशोर म्हात्रे दिव यांची हार्मोनियमची साथ लाभली. श्रीराम जन्मोत्सवाचे कीर्तन, पादुका पूजनाचे कीर्तन, हभप प्राची व्यास यांनी केले. या वेळी परिसरातील ग्रामस्थांनी या उत्सवाचा व कीर्तनाचा लाभ घेतला.

### बौद्ध महासभा कार्यालयाचे उद्घाटन

**पेण** : कोकण प्रदेश बौद्ध महासभा या धार्मिक संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन सरपंच राजेश मोकल, धम्मचळवळीचे नेते राजाराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. किरण गायकवाड, उपाध्यक्ष बी. बी. कांबळे, सचिव विजय गायकवाड, पेण तालुकाध्यक्ष राम गायकवाड, संघटक राहुल गायकवाड, बौद्धाचार्य नारायण जोशी आदी उपस्थित होते. राजाराम मोरे यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळ हा विभाग मध्यवर्ती ठिकाणी येत असल्याने राज्यातून येणाऱ्या आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांना या कार्यालयाचा आधार घेता येईल आणि त्यामुळेच खऱ्या अर्थाने प्रभाकर गायकवाड यांच्यानंतर चळवळ जीवंत ठेवण्याचे काम विजय गायकवाड यांनी ठेवले असल्याचे सांगितले.



# 'पावित्र्य राखून पालखी उत्सव साजरा करा'

**नागोठणे : प्रतिनिधी**

ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेची पालखी उत्सव सोहळा शुक्रवारी (दि. ७) साजरा होत आहे. त्या अनुषंगाने नुकतीच उत्सव कमिटी अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांची पोलीस ठाण्यात घेण्यात आलेल्या बैठकीत पारंपरिक वाद्यांसह पावित्र राखून पालखी उत्सव साजरा करण्याचे आवाहन पोलीस निरिक्षक राजन जगताप यांनी केले.



या बैठकीत मंदिर ट्रस्टचे सचिव भाई टके, उत्सव कमिटी अध्यक्ष नितिन राऊत, माजी अध्यक्ष विलास चौलकर, ग्रामपांचयत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, राजेश पिंपळे, हवालदार विनोद पाटील, नारायण तेलंगे, मंगेश कामथे, प्रथमेश काळे, राजा गुरव, रूपेश नागोठणेकर, विवेक सुभेकर, किरण काळे, मनोज गायकर, प्रणव रावकर, जगदीश चौलकर, शंकर भालेकर यांच्यासह उत्सव कमिटी पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

पालखी उत्सवाबाबत यापूर्वी जोगेश्वरी मंदिरात घेण्यात आलेल्या विविध ठरावांची प्रत अध्यक्ष नितिन राऊत यांनी पोलीस निरीक्षक जगताप यांना दिली.

पोलीस निरीक्षक राजन जगताप यांनी, पारंपरिक वाद्यांसह पावित्र राखून पालखी उत्सव साजरा करण्याचे आवाहन करून डीजे व स्पीकरला पूर्णपणे बंदी असल्याचे सांगितले. पालखीत खालू-बाजा, ढोलताशा, लेझीम, बेन्जो पथक, टाळ-मृदुंगाचा वापर करावा, पूजनासाठी प्रत्येक आळी ठराविक वेळ देऊन त्याचे पालन करावे, यासाठी उत्सव कमिटी व आळीतील स्थानिक दोन स्वयंसेवकांनी दिलेली वेळ पाळावी, वेळेचे बंधन न पाळल्यास पालखी पोलीस व कमिटीच्या मदतीने पुढे नेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी, उत्सवात काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी देवीचे मुखवटे व पालखीचे संरक्षण करण्याची जबाबदारी पोलीस यंत्रणेप्रमाणेच देवस्थान कमिटीचे सदस्य, देवळाचे गुरव तसेच आळीमधील ठरलेले स्वयंसेवक यांची राहिल, सांगितले.

# वढाव येथे बहिरीदेवाचा यात्रोत्सव

**पेण : रामप्रहर वृत्त**

वढाव येथील श्री बहिरी देवस्थानाची यात्रा मंगळवारी (दि. ४) होत आहे. बहिरीदेवाचा छबिना दुपारी बारा वाजता ढोलाच्या गजरात बहिरी देवाची गाणी म्हणत छबिना निघतो. बहिरी देवाच्या सोबत पाठीवर व पायावर पेरकुटे भाविक भक्तजन मारतात. भक्तांच्या पाठीवर त्यावेळी हळद टाकली जाते. पाठीवर पेरकुटाचे रुतलेले काटे नंतर एक ते दोन दिवसांनी पाठीतून आपोआप बाहेर निघतात. हे या यात्रेचे वैशिष्ट्य आहे.

बहिरीदेव मोठेवढाववरून वढाव येथे राधाकृष्णाच्या देवळाजवळ आल्यावर शर्यतीच्या हेलकोटी (देवकाठ्या) उभारल्या जातात. या काठ्या उंच अशा कळकीच्या बांबूपासून बनविलेले असतात. त्यातून १ ते ३ क्रमांक काढले जातात. त्यानंतर ढोल वाजवायाच्या एक चाल व दोन चाल या चालीच्या ढोलाच्या वाजवायाच्या स्पर्धा होऊन विजेत्यास बक्षीस दिले जाते. या बहिरीदेवाचा विशेष म्हणजे ही मूर्ती ८० वर्षांपूर्वी एका अखंड लाकडाची असून त्या लाकडाचा घोडा व घोड्यावर स्वार झालेला बहिरीदेव अशी मूर्ती आहे. बहिरी पाच दिवस देवळाबाहेर ठेवून सतत चार दिवस ढोलावर तालात गाणी म्हटली जाऊन जागरण केले जाते. नंतर पाचव्या दिवशी सकाळी अभिषेक करून सकाळी नऊ वाजता बहिरीदेव त्याच्या सिंहासनावर ठेवला जातो. बहिरीदेवाची यात्रा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी खारेपाटातील आई जगदंबे वाशीची यात्रा असते.

# सावरकर गौरव यात्रा ४ व ५ एप्रिलला कर्जत-खालापूरमध्ये



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघात स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेचे ४ व ५ एप्रिलदरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेप्रमाणे शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या संयुक्त विद्यमाने कर्जत-खालापूर विधानसभेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेचे ४ व ५ एप्रिलदरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेच्या पूर्वतयारीसाठी पोसरी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, शाखा पदाधिकारी, महिला आघाडी कार्यकर्त्या, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेण कृषी उत्पन्न बाजार समितीची ३० एप्रिलला सार्वत्रिक निवडणूक

**पेण : प्रतिनिधी**

पेण कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल रोजी होणार आहे. एकूण १८ जागांसाठी ही निवडणूक होणार असून यामध्ये बहुउद्देशी सहकारी संस्था एकूण ११ सदस्यांमध्ये सर्वसाधारण सात, महिला दोन, इतर मागासवर्ग एक, भटक्या विमुक्त जाती-जमाती एक असे असणार आहेत.

ग्रामपंचायत प्रतिनिधींमधून चार यामध्ये सर्वसाधारण दोन, अनुसूचित जाती जमाती एक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक एक, व्यापारी व अडते प्रतिनिधी दोन, हमाल व तोलारी प्रतिनिधी एक असे १८ प्रतिनिधी असून ३ एप्रिलपर्यंत अर्ज भरायचा आहे. अर्जाची छाननी ५ एप्रिलला होईल. ६ एप्रिल रोजी यादी प्रसिद्ध केली जाईल, तसेच ११ ते ३ वा. च्या दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ असेल. अंतिम यादी प्रसिद्धी २१ एप्रिल रोजी होईल. चिन्हाचे वाटपदेखील त्याच दिवशी करण्यात येईल. मतदान ३० एप्रिल रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वा.पर्यंत घेण्यात येईल. मतमोजणी त्याच दिवशी करण्यात येईल

# सहज सेवा फाउंडेशनतर्फे डॉक्टर मार्गदर्शन व्यवस्था

**खालापूर : प्रतिनिधी**

सहज सेवा फाउंडेशनतर्फे डॉक्टर मार्गदर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

खोपोली शहरात बऱ्याच ठिकाणी निधन झालेल्या व्यक्तींना फॅमिली डॉक्टर नसल्यास वा रात्री-अपरात्री जवळच्या दवाखान्यात डॉक्टर उपलब्ध नसल्यास मृत घोषित करताना समस्या निर्माण होते. हे लक्षात घेता, सहजसेवा फाउंडेशनद्वारे डॉक्टर मार्गदर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ रविवारी (दि. २) करण्यात आला.

या वेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, उपाध्यक्ष इशिका शेलार, उपक्रम प्रमुख राजेंद्र फक्के, मार्गदर्शक मोहन केदार, निशिता कार्या, आर्या शिंदे, संचिता पाटील,सागरिका जांभळे,वेदांत मोरे, सोहम ढोकळे उपस्थित होते. खोपोलीकरांना भासत असलेली ही अडचण लक्षात घेऊन, दुःखद प्रसंगात निश्चित उपयोगी पडणारी बाब म्हणून सूचना व मार्गदर्शन बहुमोल ठरेल, असा आशावाद उपक्रम प्रमुख व मार्गदर्शक राजेंद्र फक्के यांनी व्यक्त केला.



# लखनऊकडून दिल्लीचा धुव्वा

## मार्क वूडचे पाच बळी





**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शनिवारी दिवसातील दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपरजायंट्स यांच्यादरम्यान खेळला गेला. या सामन्यात यजमान लखनऊने दिल्ली संघाला ५० धावांनी धूळ चारली. लखनऊने प्रथम फलंदाजी करताना १९४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ नऊ गडी गमावून १४३ धावाच करू शकला. लखनऊच्या मार्क वूडने पाच बळी घेत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले.

धावांचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली होती, मात्र, अचानक लखनऊच्या ताफ्यातील मार्क वूड नावाचे वादळ घोंगावले. त्याने चार षटकांत अवघ्या १४ धावा देत पाच गडी बाद केले. डीसीकडून कर्णधार डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ४८ चेंडूंत सात चौकारांसह ५६ धावांची खेळी केली. त्याव्यतिरिक्त रिले रुसो ३० (२०), अक्षर पटेल १६ (११) आणि पृथ्वी शॉ १२ (९) यांनाच केवळ दोन आकडी संख्या गाठता आली. आवेश खान आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करीत वूडला साथ दिली.

तत्पूर्वी, दिल्लीच्या चेतन सकारियाने चौथ्या षटकात लखनऊचा कर्णधार लोकेश राहुल (८) याला बाद केले. कायले मायर्सचा सोपा झेल खलिल अहमदने टाकला अन् तोच महागात पडला. त्याने २९ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. दीपक हुडा व मायर्स यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूंत ७९ धावांची भागीदारी केली. यापैकी ६२ धावा (२४ चेंडू) या मायर्सने चोपल्या होत्या. कुलदीप यादवच्या गुगलीवर हुडा (१७) झेलबाद झाला. मायर्स ३८ चेंडूंत दोन चौकार व सात षटकारांसह ७३ धावांवर त्रिफळाचीत झाला. लखनऊने कृणाल पांड्याला प्रमोशन देताना चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवले. डोकेदुखी ठरणाऱ्या मार्कस स्टॉयनिसला (१२) खलिलने बाद करून दिल्लीला मोठे यश मिळवून दिले. एक कॅरेबियन खेळाडू बाद झाल्यानंतर निकोलस पूरन दिल्लीचे टेन्शन वाढवताना दिसला. त्याने २१ चेंडूंत दोन चौकार व तीन षटकारांसह ३६ धावा केल्या. खलिलच्या गोलंदाजीवर पृथ्वी शॉने चांगला झेल टिपला. खलिलने ३० धावांत दोन विकेट्स घेतल्या. त्यानंतर आलेल्या आयुष बदोनीने सात चेंडूंत १८ चेंडू कुटल्या, चेतनने त्याची विकेट घेतली.

लखनऊच्या डावातील अखेरच्या चेंडूवर इम्पॅक्ट प्लेअरच्या रूपात कृष्णप्पा गौथमने खेळपट्टीवर येताच षटकार ठोकत आपल्या संघाची धावसंख्या १९३ करून टाकली.

# भाजपच्या क्रीडा महोत्सवास खेळाडूंचा मोठा प्रतिसाद



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष आयोजित क्रीडा महोत्सवास क्रीडाप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. माजी नगरसेवक सुरज पाटील यांच्या पुढाकाराने या महोत्सवातील स्पर्धा सारसोळे, नेरूळ सेक्टर ८ व सेक्टर १० आणि कुकशेत मैदान आदी ठिकाणी एकाचवेळी खेळल्या जात आहेत.

सलग तीन दिवस रंगणाऱ्या या क्रीडा महोत्सवात बुद्धिबळ, कॅरम, १०० व २०० मीटर धावणे, क्रिकेट सामने, महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी पाककला व सौंदर्यवती स्पर्धा तसेच हळदीकुंकू आदी समारंभ असून प्रत्येक स्पर्धेत शेकडोच्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे.

कोरोना काळात मोबाईलविश्वात हरवलेली पिढी मैदानात उतरून त्यांच्यात मैदानी खेळांविषयी आवड निर्माण व्हावी आणि उद्याचे आदर्श खेळाडू निर्माण होऊन त्यांनी नवी मुंबई शहराचा नावलौकिक उंचवावा म्हणून हा भव्य क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला असून त्यास मोठा प्रतिसाद लाभत असल्याचे आयोजक सुरज पाटील यांनी सांगितले.

## माद्रिद मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सिंधू अंतिम फेरीत

**माद्रिद :** भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने अपयशाच्या मालिकेतून बाहेर पडताना यंदाच्या हंगामातील पहिल्या अंतिम फेरीत प्रवेश केला. माद्रिद मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सिंधूने शनिवारी सिंगापूरच्या येओ जिया मिनचे आव्हान २४-२२, २२-२० असे मोडून काढले. लौकिकाला साजेसा खेळ करीत सिंधूने ४९ मिनिटांच्या लढतीनंतर जियाचे आव्हान परतवून लावले. विजेतेपदासाठी सिंधूची गाठ आता अग्रमानांकित कॅरोलिना मारिन आणि ग्रेगोरिया मरिस्का तुनजुंग यांच्यातील विजेतीशी पडणार आहे.



**पनवेल : भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदा कॉलनी येथे कै. दुनकुरी बाळू म्हात्रे यांच्या स्मरणार्थ मस्ती ग्रुपच्या वतीने खांदा कॉलनी प्रीमियर लीग या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप कामगार संघटना तालुका अध्यक्ष मोतीराम कोळी, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य भीमराव पोवार, सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार कापसे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.**

## ओम् श्री साईनाथ सेवा ट्रस्ट आयोजित कबड्डी स्पर्धा

# आदर्श मंडळाने पटकाविले विजेतेपद




**मुंबई : प्रतिनिधी**

आदर्श क्रीडा मंडळाने ओम् श्री साईनाथ सेवा ट्रस्टने आयोजित केलेल्या पुरुष द्वितीय श्रेणी (स्थानिक) गटात विजेतेपद पटकाविले. पंचगंगाचा रवींद्र साळुंखे स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडू ठरला, तर आदर्श मंडळाचा सुशील वाडकरला लक्षवेधी कोपरारक्षकाचा मान मिळाला.

प्रभादेवी समुद्र किनाऱ्याजवळील मंडळाच्या पटांगणावर खेळविण्यात आलेल्या अंतिम सामन्यात आदर्श मंडळाने पंचगंगा मंडळाचा ४०-२० असा सरळ पराभव करीत अंतिम विजेतेपद पटकाविले. प्रतिस्पर्धी संघाचा अंदाज घेत सावध खेळ करणाऱ्या आदर्शकडे पूर्वार्धात १६-११ अशी महत्त्वपूर्ण आघाडी होती. उत्तरार्धात मात्र त्यांनी टॉप गिअर टाकत आपल्या खेळ गतिमान केला आणि २० गुणांच्या मोठ्या फरकाने विजय साजरा केला.

रोशन पाटील यांच्या आक्रमक चढाया त्याला रोशन पाटील, सुशील वाडकर, सौजन्य मोरे यांनी भक्कम बचाव करीत दिलेली मोलाची साथ यामुळे आदर्शने हा सामना आपल्या बाजूने झुकविला. पंचगंगाच्या रवींद्र साळुंखे, महेश जाधव, प्राणिल गजये यांनी पूर्वार्धात उत्तम लढत दिली, उत्तरार्धात मात्र त्यांचा खेळ ढेपाळला.

# दिल्लीच्या डगआउटमध्ये पंतची अनोखी झलक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान दिल्ली कॅपिटल्सचा माजी कर्णधार ऋषभ संघासोबत नसतानाही डगआऊटमध्ये दिसला. दिल्लीने ऋषभची जर्सी डगआउटच्या छतावर टांगली होती. हा फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला.

दिल्ली संघाने या मोसमात आपला नियमित कर्णधार आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतशिवाय प्रवेश केला आहे, कारण कार अपघातानंतर तो सध्या उपचार घेत आहे. हा सामना सुरू होण्यापूर्वीच दिल्लीचे मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग म्हणाले होते की, ऋषभ हा संघासोबत डगआउटमध्ये बसेल. दिल्ली कॅपिटल्सची जर्सी लाँच करताना पाँटिंगने हे सांगितले त्या वेळी त्याचे बोलणे ऐकून सर्वांनाच धक्का बसला होता. त्याचा उलगडा नंतर झाला.

दिल्ली संघाच्या डगआऊटमध्ये लावलेल्या फोटोत दिल्ली फ्रँचायझीचे क्रिकेट संचालक आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली रिकी पाँटिंगसह ऋषभच्या जर्सीखाली दिसून आले. हा फोटो पाहून सगळ्यांनीच दिल्लीच्या टीमचे कौतुक केले.

दरम्यान, पंत दुखापतीतून सावरत असून अनेक माजी खेळाडू त्याची भेट घेऊन त्याला धीर देत असल्याचे चित्र आहे.

# अभिनव स्पोर्ट्स क्लबच्या कबड्डी स्पर्धेत शिवगर्जना मंडळ, आकांक्षा मंडळ विजेते



**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनव स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या पुरुष तृतीय श्रेणी (स्थानिक) गटात शिवगर्जना मंडळाने, तर कुमार गटात आकांक्षा मंडळाने जेतेपद पटकाविले.

माटुंगा पूर्व येथील नप्पू लखमशी मनोरंजन मैदानावर झालेल्या तृतीय श्रेणी गटाच्या अंतिम सामन्यात शिवगर्जना मंडळाने गुरुमाऊली स्पोर्ट्सचा ३०-१९ असा पराभव करीत अंतिम विजेतेपद मिळविले. पहिल्या डावात एकमेकांचा अंदाज घेत सावध सुरुवात करणाऱ्या दोन्ही संघांची ११-११ अशी बरोबरी होती. दुसऱ्या डावात मात्र शिवगर्जनाने आपला खेळ अधिक गतिमान करीत ११ गुणांच्या फरकाने विजयावर शिक्कामोर्तब केले. रवी खोत याच्या सावध व संयमी चढाया, तर मंगेश धुमाळचा भक्कम बचाव यामुळे हा विजय शक्य झाला. गुरुप्रसाद धामणे, दिनेश धामणे यांचा खेळ गुरुमाऊलीचा पराभव टाळण्यात कमी पडला.

कुमारांच्या अंतिम सामन्यात आकांक्षा मंडळाने अमर संदेश मंडळावर ३१-१८ अशी सहज मात करीत अंतिम विजेतेपदाला गवसणी घातली. पहिल्या सत्रात १७-१० अशी आघाडी घेणाऱ्या आकांक्षाने दुसऱ्या सत्रातदेखील सावध खेळ करीत हा विजय साकारला. लवेश चिंबडे, स्वप्नील पवार यांच्या संयमी चढाया आणि उत्कर्ष पयर यांच्या आकर्षक पकडी यामुळे हा विजय शक्य झाला.

# माजी क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांचे निधन



**जामनगर : वृत्तसंस्था**

भारताचे माजी क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. ते कॅन्सरशी झुंज देत होते. गुजरातमधील जामनगरमध्ये सलीम यांनी अखेरचा श्वास घेतला.

सलीम दुर्रानी यांचा जन्म ११ डिसेंबर १९३४ रोजी अफगाणिस्तानची राजधानी काबूल येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम अझीझ दुर्रानी होते. जन्मानंतर ते भारतात आले. त्याचे वडील अब्दुल अझीझ यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध अविभाजित भारतासाठी दोन अनधिकृत कसोटी सामने खेळले. फाळणीनंतर त्यांचे वडील अब्दुल अझीझ क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कराचीला गेले, तर सलीम दुर्रानी जामनगरमध्ये आईसोबत राहिले. नंतर सलीम राजस्थानला गेले.

अर्जुन पुरस्काराने सन्मानित होणारे सलीम हे पहिले क्रिकेटपटू होते. हा सन्मान त्यांना १९६०मध्ये मिळाला होता. त्यांनी भारतासाठी २९ कसोटी खेळल्या, ज्यात त्यांनी एक शतक आणि सात अर्धशतकांच्या मदतीने १२०२ धावा केल्या तसेच ७५ विकेट्स घेतल्या.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com